**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कैलास विठ्ठलराव अक्कर,<br>रा. सिल्लोड, जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, सिल्लोड, जि. औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,सिल्लोड, जि.औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, सिल्लोड, जि.औरंगाबाद - श्री. एम. ए.किरवले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, सिल्लोड,जि.औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. टी.आर.ताठे,अ.का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७.०९.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी,जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सेतू सुविधा केंद्राच्या कार्यपध्दतीची एकूण नऊ मुद्यांद्वारे विस्तृत अशी माहिती मागितली असून याबाबत लेखी अभिप्राय द्यावेत असे त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केले आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड यांनी यासंदर्भात दि. २३.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे सेतू संचालक, औरंगाबाद यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे अपिलार्थीस कळविले आहे. तसेच दि. २५.०९.२००९ रोजी सेतू संचालक,औरंगाबाद यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार लेखी अभिप्राय मागण्याची तरतुद नाही. तरी सेतू संचालक व जिल्हाधिकारी यांच्यामध्ये जो करारनामा झ ाला आहे, त्या कराराची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयातून हस्तगत करण्यात आली आहे. त्याची प्रत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवत असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास सुनावणीच्यावेळी सांगितले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना वर नमूद केल्याप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी लागेल.अपिलार्थीस माहिती प्राप्त होताच त्यांनी पाहणी करावी व त्यांना या माहितीमध्ये (लेखी अभिप्रायाबाबतचे मुद्दे वगळून) काही त्रूटी आढळून आल्यास जन माहिती अधिकारी यांना कळवू शकतात व त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना तदनंतर पंधरा दिवसांचे आत अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या संदर्भात पूर्तता करावी लागेल. ही कार्यवाही त्यांना तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कैलास विठ्ठलराव अक्कर,संपादक-सा.सह्याद्रीचा आवाज, पांडव निवास, दत्त मंदिरासमोर, टिळकनगर, सिल्लोड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हुकूमचंद त्र्यंबक राठोड, : अपीलकर्ता
रा.गराडा,पो. ब्राम्हणी,ता.कन्नड, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
चेअरमन/सचिव,
मागासवर्गीय मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था, ब्राम्हणी,
ता.कन्नड, जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक निबंधक,सहकारी संस्था (दुग्ध),औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक निबंधक,सहकारी संस्था (दुग्ध),औरंगाबाद- श्री. विनय वि.धोटे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५.०९.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे

सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हुकुमचंद त्र्यंबक राठोड,रा.गराडा,पो. ब्राम्हणी,ता.कन्नड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा चेअरमन/सचिव,मागासवर्गीय मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था, ब्राम्हणी, ता.कन्नड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक,सहकारी संस्था (दुग्ध),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| सचिव,<br>श्री. लांबेश्वर मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्था मर्यादित,<br>लामणगांव, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अध्यक्ष/सचिव, श्री. लांबेश्वर मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्था मर्यादित, लामणगांव, तालुका खुलताबाद,<br>जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अध्यक्ष/सचिव, श्री. लांबेश्वर मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्था मर्यादित, लामणगांव, तालुका खुलताबाद,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), औरंगाबाद<br>- श्री. विनय वि. धोटे | : | उपस्थित |

४ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. ३०-०६-२००९

५ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-०९-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सचिव, श्री. लांबेश्वर मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्था मर्यादित, लामणगांव, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव, श्री. लांबेश्वर मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्था मर्यादित, लामणगांव, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.      निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने,<br>अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर, जिल्हा जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना - श्री. बी. बी. नवगीरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर,<br>तालुका बदनापूर, जिल्हा जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-०१-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८-०४-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०५-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०९-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये विस्तृत व्याप्तीची सन १९६६-६७ ते दिनांक ०९-०१-२००९ या कालावधीची स्वातंत्र्य सैनिकांची बदनापूर तालुक्यातील जमिनीच्या ७/१२ व फेरफाराच्या नकला बाबतची माहिती मागितली आहे. अर्जात नमूद केलेल्या माहितीचा स्पष्टपणे बोध होत नाही. तसेच गट नंबर, फेर नंबर, शिवाराबाबत अर्जात उल्लेख नाही तरी या सर्व बाबी स्पष्ट करण्यात याव्यात म्हणजे माहिती देणे सोईचे होईल असे तहसीलदार, बदनापूर यांनी दिनांक २७-०१-२००९ रोजी अपिलार्थीस कळविले आहे.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०७-०२-२००९ रोजीच्या पत्रान्वये काही खुलासा तहसीलदार, बदनापूर यांना केलेला आढळून येत आहे. तथापि अपिलार्थीचे हे पत्र जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाले नाही असे त्यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले. सदर पत्र आज रोजी त्यांना दाखविण्यात आले असता ते त्यांनी आज रोजी पाहिले व त्यामध्ये पुन्हा मोघम स्वरुपात माहितीबाबत उल्लेख आहे असे सांगितले.

या सर्व बाबी, आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. राजेंद्र गौतमराव गोसावी,<br>जैन राजाराणी ड्रेसेस, शॉप नं. ३, गजानन अपार्टमेंट, जिजाई हॉस्पिटलसमोर, पुंडलीकनगर, गारखेडा, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय प्रधान सचिव, नगरविकास, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप सचिव, नगर विकास, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय प्रधान सचिव, नगरविकास, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप सचिव, नगर विकास, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०६-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २३-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही.

या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, नगर विकास, मंत्रालय, मुंबई यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, नगर विकास, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, नगर विकास, मंत्रालय, मुंबई यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र गौतमराव गोसावी, जैन राजाराणी ड्रेसेस, शॉप नं. ३, गजानन अपार्टमेंट, जिजाई हॉस्पिटलसमोर, पुंडलीकनगर, गारखेडा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय प्रधान सचिव, नगरविकास, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, नगर विकास, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रावसाहेब शंकरराव सोरमारे, : अपीलकर्ता
रा. मौजे सातारा (खंडोबा), तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय अधिकारी, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२४० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद<br>- श्री. कि. मा. लवांडे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७-०४-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०७-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९-०५-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, वैजापूर आज रोजी सुनावणीस उपस्थित नाहीत ही आयोगास गंभीर बाब वाटते याची गंभीर दखल आयोग घेत आहे.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक २३-०३-२००९ ला प्राप्त झाला. अपिलार्थी यांनी या अर्जामध्ये १९९६ सालाची माहिती मागितली आहे व ती माहिती कार्यालयात तपासणी करुनही संचिका न सापडल्यामुळे देता येत नाही असे दिनांक १७-०४-२००९ ला अपिलार्थीस कळविले आहे. तसेच अपिलार्थीकडे काही पुरावा असल्यास सादर केल्यास संचिका शोधून काढणे सोईचे होईल असेही कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने प्रथम अपील केल्यानंतर त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन दिनांक २९-०५-२००९ रोजी निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील अभिलेखात देखील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचा शोध घेऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे शल्क आकारुन एक महिन्याच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. माहिती उपलब्ध होत नसल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी कारवाई केली नसल्यास त्यांना ती करावी लागेल व भविष्यात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार प्राप्त होणा-या माहिती अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही योजण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना दक्ष राहावे लागेल तसेच भविष्यात सुनावणीस त्यांनी उपस्थित राहणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०४-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रावसाहेब शंकरराव सोरमारे, रा. मौजे सातारा (खंडोबा), तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राहुल कुंडलिक पगारे, : अपीलकर्ता
रा. जायकवाडी (उत्तर), तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२४१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद - श्री. बी. एन. वाघ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. के. पी. विसपुते, अ. का. (म.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२-०६-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १५-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये सन २००० ते २००९ या कालावधीतील पैठण तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानाबाबत एकंदर १३ मुद्दयांवर विस्तृत माहिती मागितली आहे. माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे ती एकत्रित करण्यास काही कालावधी लागला. तसेच जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक २२-०६-२००९ रोजी निर्णय दिला की, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत देण्यात यावी. माहिती देण्यास विलंब झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी तहसीलदार, पैठण यांची राहील. यानंतर दिनांक २४-०६-२००९ च्या पत्रान्वये अपिलार्थीस मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती काढण्यासाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे उर्वरीत माहितीबाबत कार्यालयास उपस्थित राहून माहिती पाहण्याकरिता अपिलार्थीस कळविण्यात आले. तथापि अपिलार्थी माहिती पाहण्यासाठी उपस्थित झालेले नाहीत.

माहिती विस्तृत स्वरुपाची आहे या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राहुल कुंडलिक पगारे, रा. जायकवाडी (उत्तर), तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण,

जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कल्याणमल शांतीलाल पाटणी, : अपीलकर्ता
इ-६२/५, मयुरनगर, एन-११, हडको, नवीन औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, हिंद सेवा मंडळाची प्राथमिक शाळा, बागडपट्टी, नेताजी सुभाष रोड, तोफखाना, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी, :
हिंद सेवा मंडळ, अहमदनगरची प्राथमिक शाळा, बागडपट्टी, नेताजी सुभाष रोड, तोफखाना, अहमदनगर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कल्याणमल शांतीलाल पाटणी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, हिंद सेवा मंडळाची प्राथमिक शाळा, बागडपट्टी, नेताजी सुभाष रोड, तोफखाना, अहमदनगर<br>- श्री. उरमुडे विठ्ठल बाळू | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मानद सचिव, हिंद सेवा मंडळ, अहमदनगरची प्राथमिक शाळा, बागडपट्टी, नेताजी सुभाष रोड, तोफखाना, अहमदनगर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती त्यांना प्राप्त झालेली आहे व काही मुद्दयांवर प्राप्त होणे बाकी आहे. पाच मुद्दयांवर माहिती प्राप्त होणे बाकी आहे ती खालीलप्रमाणे आहे.

१. मुद्दा क्रमांक २ : हिंद सेवा मंडळाची पंचवार्षिक सन २०००-२००५ व २००६-२०१० साठी निवडणूक तसेच सन १९९५ पासून आजपर्यंतच्या कालावधीत शालेय समिती, सेवक सभासद फी व भरणा, शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या बढत्या, पदोन्नती, बदल्या, नव्याने नेमणुका व शासन मान्यता इत्यादी संदर्भात संस्थेच्या प्रधान कार्यालयाचे आदेश, अंमलबजावणी व कार्यवाही संदर्भात पत्रव्यवहाराच्या प्रती. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, सदरची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही त्यामुळे ती देता आली नाही.

३. मुद्दा क्रमांक ३ : याबाबत अपिलार्थी यांनी सांगितले की, शालेय समिती नियुक्तीची प्रत मिळाली तथापि केलेल्या कार्यवाहीची प्रत (proceding) प्रत मिळाली नाही. यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, ही कागदपत्रे त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाहीत.

४. मुद्दा क्रमांक ४ : याबाबत अपिलार्थी यांनी सांगितले की, या मुद्दयांतील विविध माहिती बाबत शिक्षण खात्याने शासकीय तपासण्या केल्या असल्यास त्यांच्या चौकशीच्या अहवालाच्या कागदपत्राच्या प्रती त्यांना आवश्यक आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अशी तपासणी झालेली नाही.

५. मुद्दा क्रमांक ६ : याबाबत अपिलार्थी यांनी सांगितलेकी, इमारत निधीचा तपशील सन २००६ पासून इतर खाती म्हणून ठेवल्या गेलेल्या जमा खर्चाची हिशोब तपासणीची कागदपत्रे त्यांना मिऴाली नाहीत.याबाबत सर्व माहिती देण्यात आली आहे व इतर कशाचीही माहिती त्यांच्याकडे नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

तथापि महानगरपालिका शिक्षण मंडळ, अहमदनगर यांच्या तीन पत्रांवर केलेल्या कारवाईच्या कागदपत्राच्या प्रती अपिलार्थीस देय होत आहेत त्या जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्याव्या लागतील.

वर नमूद केल्याप्रमाणे उर्वरीत पाच मुद्दयांबाबत देय होत असलेली तसेच अशा संस्थेसंदर्भात मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या संदर्भात जेवढी देय होऊ शकते तेवढी माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन शिक्षण उप संचालक, पुणे विभाग, पुणे यांना अपिलार्थीस द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आणि अपिलार्थीस देय होत असलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

२. शिक्षण उप संचालक, पुणे विभाग पुणे यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अशा संस्थेसंदर्भात मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या संदर्भात जेवढी देय होऊ शकते तेवढी माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस द्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कल्याणमल शांतीलाल पाटणी, इ-६२/५, मयुरनगर, एन-११, हडको, नवीन औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, हिंद सेवा मंडळाची प्राथमिक शाळा, बागडपट्टी, नेताजी सुभाष रोड, तोफखाना, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मानद सचिव, हिंद सेवा मंडळ, अहमदनगरची प्राथमिक शाळा, बागडपट्टी, नेताजी सुभाष रोड, तोफखाना, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षण उप संचालक, पुणे विभाग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रकाश मारोती गायकवाड, : अपीलकर्ता
माहिती सेवा समिती महाराष्ट्र विभागीय जिल्हा अध्यक्ष औरंगाबाद,
मु. पो. पानवडोद, तालुका सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय,
सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद<br>- श्री. महादेव आश्रुबा किरवले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय,<br>सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०६-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-०९-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०८-०६-२००९ रोजीच्या दोन अर्जाव्दारे सिल्लोड तालुक्यातील काही स्वस्त धान्य दुकानदारांची जानेवारी २००८ ते २००९ या कालावधीतील विस्तृत माहिती मागितली आहे. ती माहिती गोळा करण्यासाठी काही कालावधी लागला व माहिती उपलब्ध झाल्यावर दिनांक १७-०८-२००९ रोजी माहिती उपलब्ध आहे व त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहिती घेऊन जावी असे अपिलार्थीस कळविले. तथापि अपिलार्थी उपस्थित झालेले नाहीत. जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश मारोती गायकवाड, माहिती सेवा समिती महाराष्ट्र विभागीय जिल्हा अध्यक्ष औरंगाबाद, मु. पो. पानवडोद, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अरुण सोनाजीराव घोडके,<br>रा. १२३०, साळीवाडा, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अरुण सोनाजीराव घोडके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद - श्री. बी. एन. वाघ | : | उपस्थित |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | | अनुपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. के. पी. विसपुते, अ. का. (म.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १८-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली गॅसधारक व सिलेंडरबाबतची माहिती त्यांच्या कार्यक्षेत्रात येत नसल्यामुळे त्यांना ती देय होऊ शकत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १३-०७-२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी म्हणून तहसीलदार, पैठण यांच्या कार्यकक्षेत येत नाही म्हणून अपील अमान्य करण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी ही बाब मान्य करुन विनंती केली की, सदरची माहिती कोणत्या एजन्सीकडे उपलब्ध होऊ शकेल याबाबत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळवावे. ही बाब आयोगास योग्य वाटते त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना सदरची माहिती कोणत्या केंद्रीय कार्यालयातील जन माहिती अधिका-याकडे उपलब्ध होईल याचा तपशील अपिलार्थीस द्यावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण सोनाजीराव घोडके, रा. १२३०, साळीवाडा, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रंगनाथ किशनराव वसमतकर, : अपीलकर्ता

व्दारा, प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त, औरंगाबाद, खडकेश्वर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त, लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :

प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२४५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस

अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रंगनाथ किशनराव वसमतकर, व्दारा, प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त, औरंगाबाद, खडकेश्वर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बी. पी. बेंद्रे, तहसीलदार (सेवानिवृत्त), : अपीलकर्ता
प्लॉट नं. ४०, महाराणा प्रताप सोसायटी, सिडको, एन-७, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विशेष भूसंपादन अधिकारी, क्रमांक २, बीड, मध्यवर्ती इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बी. पी. बेंद्रे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष भूसंपादन अधिकारी, क्रमांक २, बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६-०३-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३१-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०-०४-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती, जन अपिलीय अधिकारी

यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर तीन आठवड्यात माहिती देण्याचे दिनांक २०-०४-२००९ रोजी आदेश देऊनही त्यांना, अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. ही बाब आयोगास गंभीर वाटते. त्याचप्रमाणे आज रोजी सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी कोणीही उपस्थित नाहीत याची आयोग गंभीर नोंद घेत आहे. भविष्यात आयोगापुढील सुनावणीस त्यांना व्यक्तिशः उपस्थित रहावे लागेल याची त्यांनी दक्षता घेणे आवश्यक राहील.

प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल व याबाबतची खातरजमा जिल्हाधिकारी, बीड यांना करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बी. पी. बेंद्रे, तहसीलदार (सेवानिवृत्त), प्लॉट नं. ४०, महाराणा प्रताप सोसायटी, सिडको, एन-७, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, क्रमांक २, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीनिवास त्रिंबकराव सोळंके, : अपीलकर्ता
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
जन अपिलीय अधिकारी, :
नायब तहसीलदार (आस्थापना विभाग),
जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२४७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अव्वल कारकुन (आस्था-२),जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड- श्री. ए.एम.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - नायब तहसीलदार (आस्थापना),जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९.०८.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती वगळून प्रश्नपत्रिकेच्या प्रती व आदर्श उत्तरपत्रिकेची प्रत इ. कागदपत्रे अपिलार्थीस देण्यात आली आहेत. अपिलार्थी यांनी ही माहिती व्यक्तिशः हस्तगत केली आहे व जन माहिती अधिकारी यांनी ही कार्यवाही अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर केलेली आहे. अपिलार्थी यांना त्यांच्या स्वत:ची अथवा इतर उमेदवारांनी सोडवलेल्या उत्तरपत्रिकेची प्रत अधिनियमातील कलम ८(१)(ङ) अन्वये देय होणार नाही. या सर्व बाबी विचारात घेता विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०४-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास त्रिंबकराव सोळंके,सी-१,आभुषण पार्क,गट नं.८३, देवळाई रोड,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन (आस्था-२),जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार (आस्थापना विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अरुण रघुनाथ गायके, : अपीलकर्ता
रा. रेल, ता.कन्नड, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, कन्नड, जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, सिल्लोड, जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अरुण रघुनाथ गायके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, कन्नड,जि.औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. एन.एम.पवार, ना.त.(पु.) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, सिल्लोड, जि.औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. टी.आर.ताठे,अ.का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१.०८.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीमध्ये जिल्हा परिषद सर्कल असा विशिष्ट उल्लेख केलेला नव्हता. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले की, त्यांनी जिल्हा परिषद सर्कलची माहिती मागितलेली आहे. तसेच अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये कालावधी नमूद केलेला नाही. त्यामुळे त्यांना माहिती देता आली नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ३१.०८.२००९ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती द्यावी, असे सूचित केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी आज आयोगास अवगत केले की,त्यांना जिल्हा परिषद सर्कल अंतर्भूत सर्व गावांची माहिती अभिप्रेत आहे. यासंदर्भात आयोगाने असे सूचित केले की, त्यांनी नेमकी गावे सांगून मागितलेल्या माहितीची व्याप्ती कमी करावी म्हणजे जन माहिती अधिकारी यांना माहिती देणे सुलभ होईल.ही बाब अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी मान्य केली व दहा गावांची नावे देतो असे सांगितले, त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहितीपैकी निवडक दहा गावांची नावे जन माहिती अधिकारी यांना कळवावीत. जन माहिती अधिकारी यांना त्या दहा गावांची माहे मे, २००९ या महिन्याशी संबंधित माहिती अपिलार्थीस तीस दिवसांचे आत द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रघुनाथ गायके, मु.पो.रेल, ता.कन्नड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, कन्नड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मण विठ्ठल वाणी, | : | अपीलकर्ता |
| रा.पैठण, जि.औरंगाबाद | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अन्न धान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद - श्री. किसनराव लवांडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५.१०.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या अनुपस्थितीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे

सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतू महादू जंगले,गट नं.१५३, प्लॉट नं.४८,अलोक नगर, सातारा परिसर, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑप.हौसिंग फायनान्स लि.मुंबई, जिल्हा कार्यालय, अदालत रोड,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑप.हौसिंग फायनान्स लि.मुंबई **मार्फत औरंगाबाद कार्यालय,अदालत**

**रोड,औरंगाबाद** यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. देविदास सांडु दांडगे, : अपीलकर्ता
रा.सिल्लोड, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय,भोकरदन, जि.जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी (सध्याचे)- कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,भोकरदन,जि. जालना - श्री. बी.डी. राठोड | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी (तत्कालीन)- कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, भोकरदन,जि.जालना - श्री. ए.सी.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, भोकरदन जि.जालना - श्री. एम.एस.बोईनवाड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.०६.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दि. १३.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे भोकरदन तालुक्यातील कृषि विभागामार्फत सन २००५ ते दि.१३.०३.२००९ या कालावधीतील सुरु असलेल्या सर्व कामांची व कार्यरत कर्मचाऱ्यांची तपशीलवार माहिती सत्यप्रतीच्या स्वरुपात मागितली आहे. सदरचा अर्ज त्यांच्या कार्यालयात दि. १७.०३.२००९ रोजी प्राप्त झाला. ही माहिती फार मोठया प्रमाणात असल्याने संकलीत करण्यास काही कालावधी लागला. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या एकूण पृष्ठांची संख्या ४३,५०० असून छायांकित प्रती काढण्यासाठी ₹८७,०००/- आवश्यक असल्याने हा निधी उपलब्ध करुन देण्याकरिता त्यांच्याकडील दि. २६.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जालना यांना विनंती केली आहे व त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे. तदनंतर पुन्हा दि. १५.०४.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांचे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र साक्षांकित करुन सादर करण्याचे व त्यांनी मागितलेल्या माहितीसाठी वरिष्ठ कार्यालयाकडून निधी प्राप्त होताच माहिती देण्यात येईल, असे कळविण्यात आले आहे. यापुढे त्यांनी असेही सांगितले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांना कळविले आहे की, अपिलार्थीस हवी असलेली माहिती छायाप्रतीच्या स्वरुपात देण्याकरिता शासनाकडून निधी प्राप्त होताच माहिती उपलब्ध करुन द्यावी. सदर पत्राची प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे. आजपावेतो निधी प्राप्त नाही. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात आहे व त्यासाठी जास्त खर्च लागणार आहे. यासाठी जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देविदास सांडू दांडगे, रा.महावीर चौक,शहर पोलीस स्टेशनरोड, सिल्लोड,जि.औरंगाबाद - ४३१११२.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,भोकरदन, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,भोकरदन,जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख अमिन शेख बापूजी, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी दंडाधिकारी,
तहसील कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, औरंगाबाद- श्री.बालाजी क्षीरसागर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद -प्रतिनिधी- श्री. के.पी.विसपुते, अ.का.(म.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११.०६.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९.०७.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,औरंगाबाद यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दि. ०१.०६.२००९ रोजीच्या अर्जामध्ये त्यांना जामीन मिळण्यासंदर्भात माहितीवजा माहिती देऊन काही प्रश्न विचारले आहेत. त्यामुळे या बाबी 'माहिती' या व्याख्येत येत नसल्याने त्यांना नेमकी कोणती माहिती पाहिजे हे स्पष्ट होत नसल्यामुळे, कार्यालयातील कागदपत्रे/अभिलेखे याची स्पष्ट मागणी केल्यास नियमानुसार कागदपत्रे देता येतील, असे दि. ११.०६.२००९ रोजी कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी झाली व दि. ०९.०७.२००९ रोजी त्यासंदर्भात निर्णय देण्यात आला आहे. त्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णयामध्ये नमूद केले आहे की, "अपिलार्थी यांनी तहसील कार्यालयातील कोणत्याही कागदपत्रे अभिलेखेसंबंधी माहिती मागितल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी उपस्थित केलेले मुद्दे तहसीलदार यांच्या निकालाविरुध्द अपील किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे न्याय मागण्यासारखे आहे. करिता अपिलार्थीचे प्रथम अपील अमान्य करण्यात येत आहे."

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व आयोगासमोर केलेला युक्तिवाद यावरुन अपिलार्थीस कारागृह मुंबई संचित रजा व पॅरोल,नियम १९५९ मधील तरतुदीअन्वये संचित रजा मंजूरीसाठी जामीनदारांकडून ७/१२ किंवा रोख रक्कम घेण्याबाबत जी नियमावली/ शासन आदेश/परिपत्रके/कायदा यामधील तरतुदी आहेत त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे उचित राहील, असे आयोगास वाटते. यासंदर्भातील कागदपत्रांच्या छायाप्रती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्या लागतील.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख अमीन शेख बापूजी, बंदि क्र.सी/३४१३,औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह,हर्सुल,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजू नत्थुजी ढेंगरे, : अपीलकर्ता
रा.पैठण, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग यांचे कार्यालय,
औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग यांचे कार्यालय,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - स्वीय सहायक, विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) मध्यविभाग,औरंगाबाद यांचे कार्यालय,औरंगाबाद - श्री. बी.डी.केदारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) मध्यविभाग,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | श्री. पी.डी.भालेराव, अधीक्षक, पैठण खुले कारागृह,पैठण जि.औरंगाबाद - जन माहिती अधिकारी यांचे मदतनीस | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९.०५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२.०६.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.०६.२००८ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २३.०९.२००८

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व त्यांचे मदतनीस उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी देय असलेल्या मुद्यावरील माहिती दि. १२.०६.२००८ रोजी देण्यात आली आहे. यापुढे युक्तिवादामध्ये त्यांनी सांगितले की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा कारागृह उपमहानिरीक्षक यांनी सुनावणी घेऊन दि. ३०.०६.२००८ रोजी निर्णय दिला आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेले पत्र दि. १५.०६.२००८ रोजी मिळाल्याची पोच कार्यालयास प्राप्त झाली आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही त्यांच्या जीवित व स्वातंत्र्या संदर्भातील नसल्यामुळे ४८ तासांच्या आत पुरविण्यात आलेली नाही. तसेच जी माहिती देय होत नाही, ती देण्यात आलेली नाही. अपिलार्थी यांनी इतर (एकूण ६०) बंद्यांबाबत माहिती विचारली आहे. ती त्यांना देय होत नाही.

आयोगासमोर केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजू नत्थूजी ढेंगरे,बंदी क्र. ३५५४,खुले कारागृह पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा स्वीय सहायक, विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) मध्यविभाग,औरंगाबाद यांचे कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) मध्यविभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गजानन हरीभाऊ जावरे, : अपीलकर्ता
रा. पैठण, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हा व सत्र न्यायालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हा व सत्र न्यायालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रबंधक,जिल्हा व सत्र न्यायालय,औरंगाबाद- श्री. जी.डी.गायकवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा न्यायाधीश-१,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०२.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितली आहे. त्याचप्रमाणे त्यांनी संदर्भित केलेला तक्रार अर्ज प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी दि. २३.०१.२००८ रोजी

अपिलार्थीच्या तक्रारीमध्ये काही तथ्य आढळून येत नसल्यामुळे अमान्य केला आहे. ही बाब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०७.०२.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविली आहे. आयोगासमोर केलेला युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे मागितलेली माहिती - "संदर्भित अर्जावर त्यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीच्या छायाप्रती" - ही माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय होत आहे व ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबतच्या कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गजानन हरीभाऊ जावरे, बंदी क्र. ३७६८,खुले कारागृह पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,जिल्हा व सत्र न्यायालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश-१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,<br>बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या<br>पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. उत्तमराव हरीभाऊ कमनंदार,<br>रा. जायकवाडी (उ), ता.पैठण, जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>वरिष्ठ तुरुंग अधिकारी,<br>खुले जिल्हा कारागृह, पैठण, जि. औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमहानिरीक्षक, खुले कारागृह, हर्सुल, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तुरुंग अधिकारी,वर्ग-१, खुले जिल्हा कारागृह,पैठण,जि.औरंगाबाद-श्री. बी. बी. औताडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक, पैठण खुले जिल्हा कारागृह,पैठण, जि.औरंगाबाद- श्री. पी.डी.भालेराव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४.०२.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.०१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०.०२.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०२.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी त्यांना देय असलेली माहिती दि. ०४.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ती व्यक्तिशः स्वीकारलेली आहे व माहिती मिळाल्याबाबतची पोच दि. ०६.०२.२००८ रोजी दिलेली आहे. त्याचप्रमाणे त्यावर अपिलार्थीने त्यांचे यानंतर औरंगाबाद येथील अपील अर्ज रद्द समजण्यात यावा, असेही नमूद केले आहे. आयोगापुढे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन ही बाब आढळून येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी दि. २८.०२.२००८ रोजीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये माहिती त्यांना प्राप्त झाली असून काही माहिती अपुरी मिळाली असल्याचे नमूद केले आहे. यास्तव जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिलेल्या माहितीची पुन्हा एकदा पडताळणी करावी लागेल व तदनंतर काही माहिती यापूर्वी दिली गेली नसल्यास उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल किंवा कार्यालयाच्या कक्षेत येत नसल्यास अपिलार्थीस तसे कळवावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उत्तमराव हरीभाऊ कमनंदार, रा.जायकवाडी (उ), ता. पैठण, जिल्हा औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तुरुंग अधिकारी,वर्ग-१, खुले जिल्हा कारागृह, पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, खुले जिल्हा कारागृह,पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मनोज वासुदेव इंगळे, : अपीलकर्ता
रा. पैठण, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४५४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग पैठण, जि.औरंगाबाद - श्री. के.बी.सारुख | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,सा.बां.विभाग,औरंगाबाद- श्री.बी.डी. तोडकरी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०६.०६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.०७.२००७ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २४.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.०३.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०५.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये सन १९९७ ते २००७ या कालावधीची खुले जिल्हा कारागृह,पैठण येथील बंदी वसाहत,कार्यालय व कर्मचारी निवासस्थाने इत्यादी बांधकामाबाबत विविध कामांसाठी झालेल्या खर्चासंदर्भात विस्तृत अशी माहिती एकंदर १२ मुद्यांद्वारे माहिती मागितलेली आहे. माहितीची व्याप्ती मोठी असल्याकारणाने व कालावधी जास्त असल्याकारणाने माहिती एकत्रित करण्यास काही कालावधी लागला आहे. याबाबत अपिलार्थीस दि. २४.०७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे व ते आता अपिलार्थीस ती माहिती देऊ शकतात.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दृष्टीक्षेपात येत आहे की, अपिलार्थी यांनी मोठया कालावधीची विस्तृत प्रमाणात माहिती मागितलेली आहे. याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी एक दिवस (सकाळी ११.०० ते सायं.०५.००) सुनिश्चित करुन द्यावे लागतील व त्यातून काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी एक दिवस (सकाळी ११.०० ते सायं.०५.००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्यात. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मनोज वासुदेवराव इंगळे, बंदी क्र.३५५६, खुले जिल्हा कारागृह, पैठण, जि. औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सा.बां.विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. हरीश गोविंद जगासीया,<br>रा. पैठण, जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह, नाशिक | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह, नाशिक | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअधीक्षक, नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह, नाशिकरोड, नाशिक - श्री.प्रदीप अ. पाथ्रीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक, नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह, नाशिकरोड,नाशिक | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १३.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७.१२.२००७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०२.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सुनावणीच्या वेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीकरिता ₹४६/- इतक्या शुल्काचा भरणा केल्यावर त्यांना माहिती देण्यात

येणार होती. तथापि अपिलार्थी यांनी सदरचे शुल्क माफ करण्याबाबत विनंती केली, त्यानुसार सदरचे शुल्क माफ करुन जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह,नाशिकरोड यांनी दि. २२.०२.२००८ रोजी अपिलार्थीस विनामूल्य व्यक्तिशः माहिती दिली आहे व त्याबाबतची पोच अपिलार्थीने दिलेली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थीचा द्वितीय अपील अर्ज जिल्हा खुले कारागृह,पैठण, जि.औरंगाबाद येथील जन माहिती अधिकारी यांच्या दि. ३१.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दि. ०७.०२.२००८ रोजी राज्य माहिती आयोग, औरंगाबाद खंडपीठाकडे प्राप्त झाला आहे व यानंतर अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हरीश गोविंद जगासीया, बंदी क्र. सी/२२४४,खुले जिल्हा कारागृह,पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक, नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह, नाशिकरोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह, नाशिकरोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पांडुरंग मोहन धायतडक,<br>रा. पैठण, जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - पोलीस उपअधीक्षक (मु.),अहमदनगर - श्री. सुहास राणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर | : | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.०९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०६.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १६.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६.१२.२००७ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीची तारीख वाढवून देण्याची आयोगास विनंती केली. त्यांची विनंती मान्य करण्यात येत असून सदर प्रकरणाची

सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पांडुरंग मोहन धायतडक, बंदी क्र. ३६४९, खुले जिल्हा कारागृह, पैठण, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मु), अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाळु सावळीराम उबाळे, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी, :
पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय), अहमदनगर - श्री. सुहास राणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५.०६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०८.२००७ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही. अपिलार्थी यांनी जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात केलेला प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला. त्या अर्जावरुन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती मुकुंदवाडी पोलीस स्टेशन, औरंगाबाद यांच्याकडे उपलब्ध आहे, असे आढळून आले व त्या कार्यालयातील माहिती प्राप्त करुन घेतली. ही बाबही अपिलार्थीस दरम्यानच्या कालावधीत कळविण्यात आली होती. दि. ०६.०८.२००७ रोजी पोस्टाने माहिती देण्यात आली आहे. त्याची पोच प्राप्त झाली आहे व ती त्यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे आढळून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळु सावळीराव उबाळे, बंदी क्र. ५८१८, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय), अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. खंडु विठोबा कोकाटे,<br>व्दारा, मुख्य अभियंता (ज.सं.), जलसंपदा विभाग, जालना रोड, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २१-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १३-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०१-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २१-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीपैकी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिनांक १५-१०-२००९ रोजी दिलेली आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. खंडु विठोबा कोकाटे, व्दारा, मुख्य अभियंता (ज.सं.), जलसंपदा विभाग, जालना रोड, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पारखे अरुण एकनाथ,<br>रा. वाहेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २३-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | २९-०६-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०९-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १६-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २३-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांच्या दिनांक ०६-०६-२००८ रोजीच्या उपोषणाच्या नोटीशीसंदर्भात मंजूर केलेल्या मागणीपुर्ततेबाबतच्या आदेशाची प्रत व बळाचा वापर करुन काम सुरु करण्याच्या आदेशाची प्रत मागितली आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ना. म. कालवा विभाग, वैजापूर यांना दिनांक २९ जून २००९ रोजी कळवून अपिलार्थीस माहिती देय आहे ती आवश्यक ते शुल्क आकारुन द्यावी असे कळविले आहे. तथापि उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती दिल्याचे आढळून येत नाही. ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांना ती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पारखे अरुण एकनाथ, रा. वाहेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजू सखाराम पगारे, : अपीलकर्ता
गट नं. १, शिवमंदिराजवळ, मुस्तफाबाद, तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी (महसूल), उप विभागीय अधिकारी कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मंडळ अधिकारी, उस्मानपुरा, तहसील कार्यालय, औरंगाबाद - श्री. एम. टी. बेग | | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद - श्री. क्षिरसागर | | उपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी (महसूल), उप विभागीय अधिकारी कार्यालय, औरंगाबाद -<br>प्रतिनिधी - श्री. के. पी. विसपूते, अ. का. (म.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी तहसीलदार, औरंगाबाद यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद यांनी दिनांक १०-११-२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, या माहिती अर्जासंदर्भात शासकीय माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, उस्मानपुरा असून त्यांचे प्रथम अपिलीय अधिकारी नायब तहसीलदार (महसूल) असून यापुढे मंडळ अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यास रितसर नायब तहसीलदार (महसूल) यांच्याकडे प्रथम अपील करण्यात यावे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही तथापि अपिलार्थीस माहिती मिळाली नाही असे उपलब्ध कागदपत्रावरुन आढळून येत आहे व तसे मंडळ अधिकारी, उस्मानपुरा यांनीही सांगितले. या सर्व बाबी विचारात घेता तहसीलदार, औरंगाबाद जे या माहितीच्या संदर्भात कार्यक्षेत्रातील कार्यालय प्रमुख आहेत त्यांना या प्रकरणाकडे विशेष लक्ष देऊन जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती देतील अशी व्यवस्था करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजू सखाराम पगारे, गट नं. १, शिवमंदिराजवळ, मुस्तफाबाद, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, उस्मानपुरा, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रविंद्र भागाजी खरात, : अपीलकर्ता
रा. करमाड, तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३१९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०२-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०९-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २१-११-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मौजे करमाड, तालुका जिल्हा औरंगाबाद येथील प्लॉट क्रमांक ४३६ हा गहाण ठेवण्यासाठी तहसीलदार, औरंगाबाद यांची परवानगी मागितलेली आहे. ही बाब त्यांनी त्यांच्या प्रथम व व्दितीय अपिलात नमूद केली आहे. अपिलार्थीने जी परवानगी मागितली आहे

ती बाब माहिती या शब्दाच्या व्याख्येत बसत नाही म्हणून जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-१२-२००९ रोजी अर्ज निकाली काढण्यात येत आहे असे कळविले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात यावे असे आयोगाचे मत झाले आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०७-०४-२०११**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र भागाजी खरात, रा. करमाड, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कलीमोद्दीन अमीर इनामदार, : अपीलकर्ता
रा. घोडेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कलीमोद्दीन अमीर इनामदार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद - श्री. एस. एन. जफर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७-०१-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०६-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नव्हती त्यामुळे त्यांना ती देता आली नाही व आजही उपलब्ध नाही. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थी यांनी नमूद केलेल्या गट नंबर २५५, १७१ व ३०५ या गट नंबरच्या जमिनीच्या संदर्भात महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये उल्लेख नाही. त्याचप्रमाणे सर्व्हे नंबर सुध्दा नाही. त्यामुळे नमूद केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांच्या मूळ अर्जासंदर्भातील माहितीची त्यांना आता काहीही आवश्यकता राहिली नाही. तसेच त्यांच्या अर्जासंदर्भात आता त्यांना अडथळा राहिला नाही व ही बाब जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा कबूल केली आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कलीमोद्दीन अमीर इनामदार, रा. घोडेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अविनाश ज्ञानोबा कांबळे, : अपीलकर्ता
जुन्या हायकोर्टाच्या पाठीमागे, आदर्श महिला बँकेसमोर, क्रांतीनगर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३२१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०८-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०८-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २७-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०८-०९-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दिनांक १८-०९-२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

यांनी अपिलार्थीस कळविले आहे. त्याचप्रमाणे दिनांक ०८-१०-२००९ रोजी कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेतल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-११-२००९ रोजी अपिलार्थीस माहिती अर्जाच्या संदर्भात पुन्हा कळविले आहे. अपिलार्थी उर्वरीत माहिती व्यक्तिश: घेणार होते याबाबत पुढील सद्यस्थिती कागदपत्रात उपलब्ध नाही. यास्तव जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरीत माहिती पाहणीकरता कार्यालयात एक दिवस निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी. ही बाब अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे कळवावी व पहाणीनंतर अपिलार्थीस काही कागदपत्रे आवश्यक वाटल्यास त्याच्या छायांकित प्रती विनामूल्य द्याव्यात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरीत माहिती पाहणीकरता कार्यालयात एक दिवस निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी. ही बाब अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे कळवावी व पहाणीनंतर अपिलार्थीस काही कागदपत्रे आवश्यक वाटल्यास त्याच्या छायांकित प्रती विनामूल्य द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अविनाश ज्ञानोबा कांबळे, जुन्या हायकोर्टाच्या पाठीमागे, आदर्श महिला बँकेसमोर, क्रांतीनगर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रभाकर सांडू पारधे,<br>रा. हट्टी, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, हट्टी मोहाळा, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, हट्टी मोहाळा, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १३-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीच्या संदर्भात रुपये ६००० इतक्या शुल्काचा भरणा करण्यात यावा असे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-०९-२००९ रोजी अपिलार्थीस कळविलेले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ०६-१०-२००९ रोजी अपिलार्थीस निर्णय कळविला आहे की, आपण मागितलेली माहिती ग्रामपंचायत मध्ये उपलब्ध आहे तसे संबंधित ग्रामसेवक यांनी यापूर्वी आपणास कळविले आहे. त्याचप्रमाणे दिनांक ०६-११-२००९ रोजी पुन्हा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दोन रुपये प्रतिपृष्ठ याप्रमाणे शुल्क भरण्याबाबाबत कळविले आहे. दिनांक १६-११-२००९ रोजी रुपये ५३७२ इतके शुल्क माहितीकरिता भरण्यात यावे असे कळविले आहे व माहिती कार्यालयात उपस्थित राहून हस्तगत करावी असे दिनांक १२-१२-२००९ रोजी पत्रान्वये कळविले असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील नाही हे त्यांच्या मूळ अर्जावरुन आढळून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी शुल्क भरुन उपलब्ध माहिती प्राप्त करुन घेणे आवश्यक ठरत होते.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रभाकर सांडू पारधे, रा. हट्टी, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, हट्टी मोहाळा, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कल्याण भरतराव पाटील, : अपीलकर्ता
दत्त कॉलनी, कॉलेज रोड, कन्नड, तालुका कन्नड,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कृषि सह संचालक कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
कृषि सह संचालक, कृषि सह संचालक कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कल्याण भरतराव पाटील | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक प्रशासन अधिकारी, विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, औरंगाबाद - श्री. एस. डी. तायडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय अधीक्षक कृषि अधिकारी, कार्यालय विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद - श्री. एस. व्ही. शिरडकर | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. मोरे भटु श्रावण | : | उपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष - डॉ. व्ही. के. पालीमकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | २२-१२-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | २९-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २१-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक २६-११-२००९ रोजी देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी ही बाब मान्य केली तथापि मिळालेली माहिती ही अपुरी आहे व त्यांना चौकशी अहवालाची प्रत मिळाली नाही असे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, ते ही माहिती अपिलार्थीस पुन्हा देऊ शकतात. ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे व अपिलार्थीस देय असलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कल्याण भरतराव पाटील, दत्त कॉलनी, कॉलेज रोड, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय अधीक्षक कृषि अधिकारी, कार्यालय विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख वहियोद्दीन शे.रफियोद्दीन, : अपीलकर्ता
रा. अंधानेर, ता.कन्नड, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, अंधानेर, ता.कन्नड,
जि.औरंगाबाद.
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड,
जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | - | अर्जावर दिनांक नाही. |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ०५.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०८.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे सन २००५-२००९ या कालावधीमध्ये प्राप्त ग्राम निधी,दलित

वस्ती, १२ वा वित्त आयोग, घरपट्टीकरामधून जमा झालेली रक्कम व त्याचा वापर याबाबतची माहिती, स्वजलधारा पाणीपुरवठा अपूर्ण राहिलेल्या कामाबाबतची माहिती अशी एकंदर आठ मुद्यांद्वारे विस्तृत माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांना माहिती मिळाल्याचे कागदपत्रांवरुन दिसून येत नाही व प्रकरणाची सद्यस्थिती आज रोजीच्या सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे अवगत होऊ शकत नाही. अपिलार्थी यांना माहिती दिली नसल्यास जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल. याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे एक दिवस सुनिश्चित (सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे एक दिवस सुनिश्चित (सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्यात. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख वहिदोद्दीन शे. रफियोद्दीन, मु.पो.अंधानेर, ता.कन्नड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत अंधानेर, ता.कन्नड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.  निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गायकवाड रविंद्र विश्वनाथ, : अपीलकर्ता
रा. तेलवाडी, ता.पैठण,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कल्याण अधिकारी, राज्य परिवहन मध्यवर्ती कार्यशाळा,
चिकलठाणा, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
कार्यशाळा व्यवस्थापक,
राज्य परिवहन मध्यवर्ती कार्यालय, चिकलठाणा,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे सन २००९ मध्ये झालेल्या सहायक

(कनिष्ठ) या पदाच्या भरतीसंदर्भात सविस्तर माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०६.१०.२००९ रोजी कळविले आहे की, दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत सादर करावी, म्हणजे मागितलेली माहिती देणे सोईचे होईल. अपिलार्थी यांनी दि. २८.१०.२००९ रोजी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र पाठविल्याचे दिसून येत आहे. तथापि कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत सन २००२ ते २००७ या कालावधीची आहे व अद्ययावत प्रमाणपत्राची प्रत सादर करावी म्हणजे माहिती देणे सुलभ होईल. त्याचप्रमाणे दि. ११.११.२००९ रोजी अपिलार्थीस स्मरणपत्र पाठवून दि. १३.१२.२००९ रोजी अर्ज निकाली काढण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले आहे. यावरुन अपिलार्थीस माहिती मिळाली नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे एक दिवस सुनिश्चित (सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे एक दिवस सुनिश्चित (सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्यात. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र विश्वनाथ गायकवाड, मु.तेलवाडी, पो. पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कल्याण अधिकारी, राज्य परिवहन मध्यवर्ती कार्यशाळा, चिकलठाणा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यशाळा व्यवस्थापक, राज्य परिवहन मध्यवर्ती कार्यशाळा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री.केशव सावळाराम एकमोडे, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

१. पोलीस निरीक्षक,त्र्यंबकेश्वर,पोलीस ठाणे, त्र्यंबकेश्वर,जि.नाशिक
२. उपविभागीय पोलीस अधिकारी, पेठ उपविभाग, त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक

जन अपिलीय अधिकारी, :
अपर पोलीस अधीक्षक (ग्रामीण),नाशिक

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३२६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १४.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.०९.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. याची नोंद जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, नाशिक (ग्रा) यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २९.०९.२००९ रोजी निर्णयामध्ये घेतली असल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे माहितीची प्रत सोबत जोडून दिल्याचेही नमूद केलेले आहे. माहिती देण्यास अंशतः उशिर झालेला आढळून येत आहे. तथापि अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देण्यात आली आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस माहिती मिळाली आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. केशव सावळाराम एकमोडे, 'जानकी', प्लॉट नं. १८५, एन-३, सिडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, त्र्यंबकेश्वर पोलीस ठाणे, त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, पेठ उपविभाग, त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रमेश नारायण तळे,<br>रा.गेवराई सेमी, ता. सिल्लोड,जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. बाळासाहेब पवार, अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. सिताराम पवार | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन १९९० ते २००९ पर्यंत नियमित बी.एड.करणाऱ्या प्राथमिक शिक्षकांची एकूण ६ मुद्यांवर विस्तृत स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. ही सर्व माहिती एकत्रित करण्यास काही कालावधी लागला आहे. त्यानंतर अपिलार्थीस कार्यालयात उपस्थित राहून माहितीची पाहणी करण्यात यावी, असे दि. ०७.११.२००९ रोजी कळविण्यात आले आहे. तथापि अपिलार्थी उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा कालावधी व व्याप्ती पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीशीसंबंधित अभिलेखे पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही आयोगास योग्य वाटते. यास्तव जन माहिती अधिकारी यांना पुन्हा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे एक दिवस सुनिश्चित(सकाळी ११.०० ते ०५.००) करुन पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे एक दिवस सुनिश्चित (सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्यात. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमेश नारायण तळे, मु.पो.गेवराई सेमी, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. आप्पासाहेब दौलतराव मालुसरे,<br>रा. जळगाव (घाट), ता.कन्नड, जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आप्पासाहेब दौलतराव मालुसरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपशिक्षणाधिकारी सर्व शिक्षा अभियान,जिल्हा परिषद,औरंगाबाद- प्रतिनिधी - श्री. जे.बी. कामठे, सहायक कार्यक्रम अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती यापूर्वी देण्यात आली आहे. तथापि त्याचा नेमका तपशील त्यांच्याजवळ नाही. आज रोजी माहिती सोबत आणण्यात आली आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी दोन शिक्षकांबद्दल माहिती मागितली आहे. ती विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर विहित मुदतीत सुनावणी घेतली नाही. आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस सूचित केले की, त्यांनी उपलब्ध केलेली माहिती अपिलार्थीस हस्तांतरित करावी. त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी आयोगाच्यासमोर ती स्वीकारली. या मिळालेल्या माहितीमध्ये त्रुटी आढळल्यास त्याबाबत अपिलार्थीस पंधरा दिवसाचे आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल व जन माहिती अधिकारी यांना पुढील पंधरा दिवसाच्या आत त्याबाबत (मूळ अर्जासंदर्भात) पूर्तता करावी लागेल.

जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणात अपिलार्थीच्या मूळ अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७(१) अन्वये विहित मुदतीत माहिती दिलेली नाही, हा प्रमाद त्यांच्याकडून घडला आहे. त्यामुळे ते अधिनियमातील कलम २०(१) अन्वये ₹ २५,०००/- इतक्या शास्तीस पात्र ठरत आहेत,असे आयोगाचे मत झाले आहे व त्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी/कर्मचारी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचेमार्फत आयोगास खुलासा सादर करावा लागेल. या आदेशाची प्रत संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी/कर्मचारी यांना तामिल होईल, असे प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.औरंगाबाद यांना पहावे लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असलेले त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी/कर्मचारी यांना एकत्रित ₹ २५,०००/-इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा. या आदेशाची प्रत सर्व तत्कालीन जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर तत्कालीन सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर तामिल करावयाची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.,औरंगाबाद यांची राहील.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मालुसरे आप्पासाहेब दौलतराव, रा. जळगाव (घाट),पो.चापानेर, ता.कन्नड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी, सर्व शिक्षा अभियान,जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बाळासाहेब म्हस्के,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सिंचन<br>विभाग,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप अभियंता (सिंचन) जि.प.उपविभाग, वैजापूर, जि.औरंगाबाद - श्री. कुमार भाऊराव येळीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता (सिंचन),जि.प.औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. एम.देवेंद्र अप्पा, उप कार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६.१०.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीचा मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे व अपिलार्थीस ती प्राप्त झाली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आज राज्य माहिती आयोगासमोर अपिलार्थी यांचे दि. ०७.०४.२०११ रोजीचे यासंदर्भातील पत्र आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, विचाराधीन द्वितीय अपिलाशी संबंधित मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती, माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे व त्यामुळे सदरचे द्वितीय अपील क्र. ३२९/२०१० रद्द करण्यात यावे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०४-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळासाहेब म्हस्के,राहुलनगर, रेल्वेस्टेशनच्या बाजूला, विनर बेकरीसमोर, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (सिंचन) जि.प.उपविभाग वैजापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (सिंचन),जि.प.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. भानुदास चोखाजी निकाळजे,<br>रा.गोलटगाव,ता.जि. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तालुक उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -गट सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, म.गोलटगाव, ता.जि.औरंगाबाद - श्री. व्ही.पी.दळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद - श्री. जी.जी. माळवे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा गट सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, म.गोलटगाव यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीचा मूळ अर्जाद्वारे एकंदर चार मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यातील मुद्दा क्र. २ ची माहिती त्यांना देय होऊ शकत नाही व मुद्दा क्र. ३ ची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. मुद्दा क्र.४ बाबत भाष्य नाही. उर्वरित माहिती अपिलार्थीस देय असल्यामुळे ती दि. ११.०२.२०१० रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात आली आहे.अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांनी दि. १५.०१.२०१० रोजी द्वितीय अपील सादर केल्यानंतर त्यांना ही माहिती प्राप्त झाली असल्याचे दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०४-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भानुदास चोखाजी निकाळजे, मु.पो.गोलटगाव, ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मर्या.गोलटगाव, ता.जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. वैभव अभिमान पवार,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका उपनिबंधक कार्यालय,सहकारी संस्था,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.औरंगाबाद - श्री. जी.जी.मावळे | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - सचिव,नंदबोधी मागासवर्गीय सहकारी ग्राहक संस्था मर्या.,शहाबाजार,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०९.१०.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन दि. ०९.१०.२००९ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले आहे,असे आढळून येत आहे.तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, या संस्थेस शासनाकडून कोणत्याही प्रकारे निधी मिळत नाही. याबाबतची खातरजमा पुन्हा एकदा जन अपिलीय अधिकारी यांनी करावी, असे आयोगाने सूचित केले.सहकारी संस्थांसंदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार अपिलार्थीने मागितलेल्या एकूण सात मुद्यांपैकी जी माहिती देय होत असेल, त्यासाठी जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे एक दिवस (सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी एक दिवस निश्चित (सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वैभव अभिमान पवार,१५/८८, आनंदनगर,शासकीय वसाहत (कोटला कॉलनी),औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.औरंगाबाद यांचे कार्यालय यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहंमद अब्दुल फहीम, : अपीलकर्ता
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मुख्य अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
मुख्य अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहंमद अब्दुल फहीम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विशेष अधीक्षक (अतांत्रिक), लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,औरंगाबाद - - श्री. जी.जी. गादेवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - उप विभागीय अभियंता (तांत्रिक) - श्री. नाझर अली मोहम्मद उस्मान शेख | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - सहायक मुख्य प्रशासक (अभियंता), लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद - श्री. अ.ल.पाठक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १३.०१.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीचा मूळ अर्जाद्वारे आस्थापना व लेखा शाखेबाबत एकंदर बारा मुद्यांद्वारे माहिती मागितलेली आहे. ही माहिती त्यांनी अपिलार्थीस दिलेली आहे. ही माहिती एकूण ३०९ पृष्ठांसाठी शुल्क भरुन व ७० पृष्ठे विनामूल्य देण्यात आली आहेत. अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात ही बाब मान्य केली. तथापि त्यांना मिळालेल्या माहितीपैकी काही माहिती अद्यापही प्राप्त व्हावयाची आहे.सुनावणीच्या दरम्यान अपिलार्थीने मागितलेली व त्यांना देण्यात आलेली व द्यावयाची राहिलेली माहिती असे पृथक्करण करण्यात आले व त्यासंदर्भात आयोगाने अभिप्राय दिले, त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) अपिलार्थीच्या मूळ सेवापुस्तिका व त्यावरील दुय्यम सेवापुस्तिका जतन करुन ठेवण्याबाबतचे शासनाचे निर्णय/आदेश/परिपत्रके/मार्गदर्शक पत्र इत्यादींची प्रत अपेक्षित आहे. ती अप्राप्त आहे. यासंदर्भात जी माहिती (शासनाचे निर्णय/आदेश/परिपत्रके/मार्गदर्शक पत्र )उपलब्ध आहे, ती देण्यात यावी. उपलब्ध नसेल तर तसे कळवावे.

२) अपिलार्थीच्या मूळ सेवापुस्तिकेमधील शेवटचे पृष्ठ- ज्यामध्ये नोंदी घेतल्या आहेत, त्याबाबतचा तपशील. - आयोग असे सूचित करीत आहे की, अपिलार्थी स्वतःच्या सेवापुस्तिकेची माहिती मागत असल्याकारणाने आजमितीस जी स्थिती असेल, ती द्यावी.

३) मुख्य अभियंता यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कार्यविवरणनोंदवही ठेवतात, मागणी केलेल्या कार्यविवरण नोंदवहयांपैकी काही कर्मचाऱ्यांच्या मिळालेल्या आहेत. काही कर्मचाऱ्यांच्या प्राप्त नाहीत.- जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे, ती देण्यात यावी, नसेल तर तसे कळवावे.

४) आवक रजिस्टरची (दि.०७.०७.२००९ ची प्रत)- छायाप्रत देण्यात यावी.

५) मुद्दा क्र.७ संदर्भातील माहिती अप्राप्त आहे. यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे एक दिवस सुनिश्चित (सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील.

६) मुद्दा क्र.९ द्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात ज्येष्ठता सूचीमध्ये अपिलार्थीच्या नावाचा ज्या ठिकाणी उल्लेख आहे, त्या पृष्ठाची प्रत - ही माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.उपलब्ध नसेल तर तसे कळवावे लागेल.

वर स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहंमद अब्दुल फहीम, फ्लॅट नं.२, स्नेहलता अपार्टमेंट, छत्रपतीनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद
२. जन माहिती अधिकारी तथा विशेष अधीक्षक (अतांत्रिक), लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक मुख्य प्रशासक (अभियंता), लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. एस.आय.आरीफोद्दीन, : अपीलकर्ता
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, औरंगाबाद
विभाग,औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३३३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०६.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. प्रकरणात दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक असल्याने सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. एस.आय.आरीफोद्दीन,घर नंबर ४/११/४३/७३९, आझम कॉलनी, रोशनगेट,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत
भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अरुण सोनाजीराव घोडके,<br>रा. १२३०, साळीवाडा, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अरुण सोनाजीराव घोडके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २३-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित राहिले नाहीत, ही बाब जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील व ही बाब जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना पहावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण सोनाजीराव घोडके, रा. १२३०, साळीवाडा, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. कल्याणमल शांतीलाल पाटणी,<br>इ-६२/५, मयुरनगर, एन-११, हडको, नवीन औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, हिंद सेवा मंडळाची दादा चौधरी मराठी शाळा, अहमदनगर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>हिंद सेवा मंडळाची दादा चौधरी मराठी शाळा, कोर्ट गल्ली, अहमदनगर | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कल्याणमल शांतीलाल पाटणी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका, हिंद सेवा मंडळाची दादा चौधरी मराठी शाळा, अहमदनगर प्रतिनिधी - श्री. कुलकर्णी बाळासाहेब उध्दव, संस्था प्रतिनिधी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>मानद सचिव, हिंद सेवा मंडळ, अहमदनगर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, अहमदनगर व शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील. शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, अहमदनगर व शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांची विशेष साक्ष घेण्यात येईल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, अहमदनगर व शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कल्याणमल शांतीलाल पाटणी, इ-६२/५, मयुरनगर, एन-११, हडको, नवीन औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, हिंद सेवा मंडळाची दादा चौधरी मराठी शाळा, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, हिंद सेवा मंडळाची दादा चौधरी मराठी शाळा, कोर्ट गल्ली, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. ल. ग. चव्हाण, शिवेश्वर कॉलनी, १९ बी, हर्सूल परिसर, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | |
| मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख,रा. पिंपळगाव रेणूकाई, ता.भोकरदन,जि.जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ल. ग. चव्हाण व त्यांचे वकिल ॲड राम शेलकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - श्री. विश्वनाथ भागोजी दहे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८-०१-२०१० |
| ५ | राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केल्याची तारीख | | दि. १९-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी मुळ माहिती अर्जातील त्रयस्थ (अपिलार्थी) श्री. ल.ग.चव्हाण त्यांचे वकिलासह (श्री.राम शेलकर), जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय,औरंगाबाद उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,नगररचना,औरंगाबाद अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी या द्वितीय अपिलाची पार्श्वभूमी आयोगास खालीलप्रमाणे सादर केली.

मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख यांनी दि. २८.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेले स्वातंत्र्यसैनिक नामनिर्देशित कर्मचारी श्री.ल.ग.चव्हाण यांच्यासंदर्भात एकूण ९

विविध मुद्यांवर माहिती मागितली आहे. ही माहिती त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित असल्याकारणाने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीनुसार त्रयस्थ श्री. ल.ग.चव्हाण यांना दि. ३१.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये अर्जदाराने मागितलेल्या माहितीबाबत त्यांची बाजू मांडण्याची जन माहिती अधिकारी यांनी संधी दिली. त्रयस्थ श्री. ल.ग.चव्हाण यांनी दि. ०९.११.२००९ अन्वये अर्जदार यांनी मागितलेली माहिती देण्यास हरकत घेतली व अर्जदाराने अपेक्षिलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याकारणाने सदर माहिती देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. त्याबरहुकूम नगर रचनाकार यांनी त्यांच्या दि. २४.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे मूळ अर्जदार यांच्या दृष्टीक्षेपात ही बाब आणून त्यांनी मागितलेली माहिती कोणत्या लोकहितार्थ हेतूसाठी आवश्यक आहे, हे स्पष्ट होत नाही म्हणून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ अन्वये ती देता येत नाही, असे कळविले आहे. अर्जदार यांनी जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयावर दि. १०.१२.२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,नगर रचना यांनी सुनावणी घेऊन दि. १८.०१.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अर्जदार यांचा दि. २९.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जानुसार अपेक्षिलेल्या माहितीतील नगर रचनाकार कार्यालयाच्या अभिलेखातील व नगर रचना प्राधिकरणाच्या इतर कार्यालयातील अभिलेखातून उपलब्ध असलेली मुद्दा क्र. १ ते ९ ची माहिती प्राप्त करुन घेऊन अर्जदारास विनामूल्य देण्यात यावी. असा निर्णय देताना अर्जदार यांनी मागितलेली माहिती गोपनीय स्वरुपाची नसून माहिती या संज्ञेमध्ये बसते व उक्त माहिती देण्याने त्रयस्थ पक्षाचे कोणतेही नुकसान होत नाही, असा निष्कर्ष काढला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द त्रयस्थ श्री. ल.ग.चव्हाण यांनी प्रस्तुत द्वितीय अपील आयोगापुढे केले आहे. त्रयस्थ श्री.ल.ग.चव्हाण या व्दितीय अपिलात आता अपिलार्थी बनत आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी त्रयस्थ श्री.चव्हाण यांच्यातर्फे ॲड.श्री. राम शेलकर यांनी त्यांची बाजू मांडली. तसेच द्वितीय अपिलात लेखी युक्तिवाद सादर केला आहे. श्री. चव्हाण यांचे वकील यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात असे प्रतिपादन केले की, मूळ अर्जदार यांनी मागितलेली माहिती त्रयस्थाशी (आता अपिलार्थीशी ) संबंधित आहे व ती अपिलार्थीच्या व्यक्तिगत जीवनामध्ये हस्तक्षेप करणारी असून माहिती उघड केल्याने त्यांचे जीवनात आगंतूक हस्तक्षेप होऊन त्यांचे जीवन व शारीरिक सुरक्षितता धोक्यात येईल त्याचप्रमाणे सदरची माहिती मूळ अर्जदारास देण्यामध्ये व्यापक जनहित काय साध्य होणार आहे, ही बाब स्पष्ट होत नाही. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय रद्द करुन मूळ अर्जदार यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती देण्यात येऊ नये.

अपिलार्थीची बाजू अपिलार्थींच्या वकिलांच्या युक्तिवादामार्फत आयोगाने ऐकून घेतली. आयोगाने निष्कर्षाप्रत येण्यापूर्वी या प्रकरणात मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख यांना त्यांची बाजू मांडण्याकरिता संधी देण्यात यावी, असे आयोगाचे मत आहे. याकरिता प्रकरणातील सुनावणी पुढे चालू ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्या वेळी मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख यांना श्री.चव्हाण यांच्या संबंधित माहिती देण्यामुळे कोणते व्यापक जनहित साध्य होईल, यासंदर्भात त्यांचा लेखी अथवा मौखिक युक्तिवाद आयोगापुढे सादर करणे आवश्यक राहील. सदर सुनावणीस मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख,रा. पिंपळगाव रेणूकाई, ता.भोकरदन,जि.जालना यांना या सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल. अन्यथा आयोगास वस्तुनिष्ठ निर्णय घ्यावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

सदर प्रकरणाची सुनावणी पुढे चालू ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख यथावकाश कळविण्यात येईल. त्यावेळी मूळ अर्जदार श्री. गजानन संतुकराव देशमुख यांनी त्यांचा लेखी अथवा मौखिक युक्तिवाद आयोगासमोर सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गजानन संतुकराव देशमुख,रा. पिंपळगाव रेणूकाई, ता.भोकरदन,जि.जालना

२. श्री.ल.ग.चव्हाण, शिवेश्वर कॉलनी, १९ बी, हर्सूल परिसर, औरंगाबाद

३. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सु.उ.मापारी,<br>१२४, श्रीकृष्ण नगर, शहानुरवाडी, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | |
| मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे, रा.सिध्दार्थ बिल्डींग, भीमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सु.उ.मापारी व त्यांचे वकिल ॲड. राम शेलकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - श्री. विश्वनाथ भागोजी दहे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८-०१-२०१० |
| ५ | राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केल्याची तारीख | | दि. १९-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी मुळ माहिती अर्जातील त्रयस्थ (अपिलार्थी) श्री. सु.उ.मापारी त्यांचे वकिलासह (श्री.राम शेलकर), जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय,औरंगाबाद उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,नगररचना,औरंगाबाद अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी या द्वितीय अपिलाची पार्श्वभूमी आयोगास खालीलप्रमाणे सादर केली.

मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे यांनी दि. २९.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेले स्वातंत्र्यसैनिक नामनिर्देशित कर्मचारी श्री. सु.उ.मापारी यांच्यासंदर्भात एकूण ९

विविध मुद्यांवर माहिती मागितली आहे. ही माहिती त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित असल्याकारणाने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीनुसार त्रयस्थ श्री. सु.उ.मापारी यांना दि. ३१.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये अर्जदाराने मागितलेल्या माहितीबाबत त्यांची बाजू मांडण्याची जन माहिती अधिकारी यांनी संधी दिली. त्रयस्थ श्री. सु.उ.मापारी यांनी दि. ०७.११.२००९ अन्वये अर्जदार यांनी मागितलेली माहिती देण्यास हरकत घेतली व अर्जदाराने अपेक्षिलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याकारणाने सदर माहिती देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. त्याबरहुकूम नगर रचनाकार यांनी त्यांच्या दि. २४.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे मूळ अर्जदार यांच्या दृष्टीक्षेपात ही बाब आणून त्यांनी मागितलेली माहिती कोणत्या लोकहितार्थ हेतूसाठी आवश्यक आहे, हे स्पष्ट होत नाही म्हणून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ अन्वये ती देता येत नाही, असे कळविले आहे. अर्जदार यांनी जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयावर दि. १०.१२.२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,नगर रचना यांनी सुनावणी घेऊन दि. १८.०१.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अर्जदार यांचा दि. २९.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जानुसार अपेक्षिलेल्या माहितीतील नगर रचनाकार कार्यालयाच्या अभिलेखातील व नगर रचना प्राधिकरणाच्या इतर कार्यालयातील अभिलेखातून उपलब्ध असलेली मुद्दा क्र. १ ते ९ ची माहिती प्राप्त करुन घेऊन अर्जदारास विनामूल्य देण्यात यावी. असा निर्णय देताना अर्जदार यांनी मागितलेली माहिती गोपनीय स्वरुपाची नसून माहिती या संज्ञेमध्ये बसते व उक्त माहिती देण्याने त्रयस्थ पक्षाचे कोणतेही नुकसान होत नाही, असा निष्कर्ष काढला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द त्रयस्थ श्री. सु.उ.मापारी यांनी प्रस्तुत द्वितीय अपील आयोगापुढे केले आहे. त्रयस्थ श्री. सु.उ.मापारी या व्दितीय अपिलात आता अपिलार्थी बनत आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी त्रयस्थ श्री.मापारी यांच्यातर्फे ॲड.श्री. राम शेलकर यांनी त्यांची बाजू मांडली. तसेच द्वितीय अपिलात लेखी युक्तिवाद सादर केला आहे. श्री. मापारी यांचे वकील यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात असे प्रतिपादन केले की, मूळ अर्जदार यांनी मागितलेली माहिती त्रयस्थाशी (आता अपिलार्थीशी ) संबंधित आहे व ती अपिलार्थीच्या व्यक्तिगत जीवनामध्ये हस्तक्षेप करणारी असून माहिती उघड केल्याने त्यांचे जीवनात आगंतूक हस्तक्षेप होऊन त्यांचे जीवन व शारीरिक सुरक्षितता धोक्यात येईल  त्याचप्रमाणे सदरची माहिती मूळ अर्जदारास देण्यामध्ये व्यापक जनहित काय साध्य होणार आहे, ही बाब स्पष्ट होत नाही. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय रद्द करुन मूळ अर्जदार यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती देण्यात येऊ नये.

अपिलार्थीची बाजू अपिलार्थीच्या वकिलांच्या युक्तिवादामार्फत आयोगाने ऐकून घेतली. आयोगाने निष्कर्षाप्रत येण्यापूर्वी या प्रकरणात मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे यांना त्यांची बाजू मांडण्याकरिता संधी देण्यात यावी, असे आयोगाचे मत आहे. याकरिता प्रकरणातील सुनावणी पुढे चालू ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्या वेळी मूळ अर्जदार श्री.सुनिल साहेबराव मनोरे यांना श्री.मापारी यांच्या संबंधित माहिती देण्यामुळे कोणते व्यापक जनहित साध्य होईल, यासंदर्भात त्यांचा लेखी अथवा मौखिक युक्तिवाद आयोगापुढे सादर करणे आवश्यक राहील. सदर सुनावणीस मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे, रा.सिध्दार्थ बिल्डींग, भीमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद यांना या सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल. अन्यथा आयोगास वस्तुनिष्ठ निर्णय घ्यावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

सदर प्रकरणाची सुनावणी पुढे चालू ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख यथावकाश कळविण्यात येईल. त्यावेळी मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे यांनी त्यांचा लेखी अथवा मौखिक युक्तिवाद आयोगासमोर सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल साहेबराव मनोरे, रा.सिध्दार्थ बिल्डींग, भीमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद

२. श्री. सु.उ.मापारी, १२४, श्रीकृष्णनगर, शहानुरवाडी, औरंगाबाद

३. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. र.म.पालिमकर, व्दारा-सहायक संचालक, नगर रचना , औरंगाबाद, डॉ.पेंडकर इमारत, ज्युब्ली पार्क, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | |
| | मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे, रा.सिध्दार्थ बिल्डींग, भीमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. र.म.पालिमकर व त्यांचे वकिल ॲड. राम शेलकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद - श्री. विश्वनाथ भागोजी दहे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८-०१-२०१० |
| ५ | राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केल्याची तारीख | | दि. १९-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी मुळ माहिती अर्जातील त्रयस्थ (अपिलार्थी) श्री. र.म.पालिमकर त्यांचे वकिलासह (श्री.राम शेलकर), जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय,औरंगाबाद उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,नगररचना,औरंगाबाद अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी या द्वितीय अपिलाची पार्श्वभूमी आयोगास खालीलप्रमाणे सादर केली.

मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे यांनी दि. २९.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेले स्वातंत्र्यसैनिक नामनिर्देशित कर्मचारी श्री. र.म.पालिमकर यांच्यासंदर्भात एकूण ९ विविध मुद्यांवर माहिती मागितली आहे. ही माहिती त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित असल्याकारणाने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीनुसार त्रयस्थ श्री. र.म.पालिमकर यांनी दिनांक ३१.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये अर्जदाराने मागितलेल्या माहितीबाबत त्यांची बाजू मांडण्याची जन माहिती अधिकारी यांनी संधी दिली. त्रयस्थ श्री. र.म.पालिमकर यांनी दि. ०७.११.२००९ अन्वये अर्जदार यांनी मागितलेली माहिती देण्यास हरकत घेतली व अर्जदाराने अपेक्षिलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याकारणाने सदर माहिती देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. त्याबरहुकूम नगर रचनाकार यांनी त्यांच्या दि. २४.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे मूळ अर्जदार यांच्या दृष्टीक्षेपात ही बाब आणून त्यांनी मागितलेली माहिती कोणत्या लोकहितार्थ हेतूसाठी आवश्यक आहे, हे स्पष्ट होत नाही म्हणून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ अन्वये ती देता येत नाही, असे कळविले आहे. अर्जदार यांनी जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयावर दि. १०.१२.२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,नगर रचना यांनी सुनावणी घेऊन दि. १८.०१.२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अर्जदार यांचा दि. २९.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जानुसार अपेक्षिलेल्या माहितीतील नगर रचनाकार कार्यालयाच्या अभिलेखातील व नगर रचना प्राधिकरणाच्या इतर कार्यालयातील अभिलेखातून उपलब्ध असलेली मुद्दा क्र. १ ते ९ ची माहिती प्राप्त करुन घेऊन अर्जदारास विनामूल्य देण्यात यावी. असा निर्णय देताना अर्जदार यांनी मागितलेली माहिती गोपनीय स्वरुपाची नसून माहिती या संज्ञेमध्ये बसते व उक्त माहिती देण्याने त्रयस्थ पक्षाचे कोणतेही नुकसान होत नाही, असा निष्कर्ष काढला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द त्रयस्थ श्री.  र.म.पालिमकर यांनी प्रस्तुत व्दितीय अपील आयोगाकडे केले आहे. त्रयस्थ श्री.र.म.पालिमकर या व्दितीय अपिलात आता अपिलार्थी बनत आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी त्रयस्थ श्री.पालिमकर यांच्यातर्फे ॲड.श्री. राम शेलकर यांनी त्यांची बाजू मांडली. तसेच द्वितीय अपिलात लेखी युक्तिवाद सादर केला आहे. श्री. पालिमकर यांचे वकील यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात असे प्रतिपादन केले की, मूळ अर्जदार यांनी मागितलेली माहिती त्रयस्थाशी (आता अपिलार्थीशी ) संबंधित आहे व ती अपिलार्थीच्या व्यक्तिगत जीवनामध्ये हस्तक्षेप करणारी असून माहिती उघड केल्याने त्यांचे जीवनात आगंतूक हस्तक्षेप होऊन त्यांचे जीवन व शारीरिक सुरक्षितता धोक्यात येईल  त्याचप्रमाणे सदरची माहिती मूळ अर्जदारास देण्यामध्ये व्यापक जनहित काय साध्य होणार आहे, ही बाब स्पष्ट होत नाही. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय रद्द करुन मूळ अर्जदार यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती देण्यात येऊ नये.

अपिलार्थीची बाजू अपिलार्थीच्या वकिलांच्या युक्तिवादामार्फत आयोगाने ऐकून घेतली. आयोगाने निष्कर्षाप्रत येण्यापूर्वी या प्रकरणात मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे यांना त्यांची बाजू मांडण्याकरिता संधी देण्यात यावी, असे आयोगाचे मत आहे. याकरिता प्रकरणातील सुनावणी पुढे चालू ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्या वेळी मूळ अर्जदार श्री.सुनिल साहेबराव मनोरे यांना श्री.पालिमकर यांच्या संबंधित माहिती देण्यामुळे कोणते व्यापक जनहित साध्य होईल, यासंदर्भात त्यांचा लेखी अथवा मौखिक युक्तिवाद आयोगापुढे सादर करणे आवश्यक राहील. सदर सुनावणीस मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे, रा.सिध्दार्थ बिल्डींग, भीमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद यांना या सुनावणीस व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल. अन्यथा आयोगास वस्तुनिष्ठ निर्णय घ्यावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

सदर प्रकरणाची सुनावणी पुढे चालू ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख यथावकाश कळविण्यात येईल. त्यावेळी मूळ अर्जदार श्री. सुनिल साहेबराव मनोरे यांनी त्यांचा लेखी अथवा मौखिक युक्तिवाद आयोगासमोर सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल साहेबराव मनोरे, रा.सिध्दार्थ बिल्डींग, भीमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद

२. श्री. र.म.पालिमकर, व्दारा-सहायक संचालक, नगर रचना, औरंगाबाद, डॉ.पेंडकर इमारत, ज्युब्ली पार्क, औरंगाबाद

३. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजू सखाराम पगारे, : अपीलकर्ता
गट नं. १, शिवमंदिराजवळ, मुस्तफाबाद, तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद<br>-प्रतिनिधी - श्री के. पी. विसपूते, अ. का. (म.) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद<br>- श्री. किसनराव लवांडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २२-०९-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीपोटी रुपये चार इतक्या शुल्काचा भरणा करावा म्हणजे माहिती देता येईल असे अपिलार्थीस दिनांक १५-१०-२००९ रोजी कळविलेले आहे. असे कळविताना शुल्क कोणत्या लेखाशीर्षाखाली जमा करावे याचाही तपशील दिला आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन दिनांक ०४-१२-२००९ रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस दिनांक १५-१०-२००९ च्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे शुल्क भरुन माहिती हस्तगत करावी असे कळविले असल्याकारणाने अपील नामंजूर केले आहे.

आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत तथापि अपिलार्थीने दिनांक ०१-०१-२०१० रोजी शुल्काचा भरणा केला आहे व त्याप्रमाणे माहिती प्राप्त केली आहे असे आयोगापुढील कागदपत्रा-वरुन आढळून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजू सखाराम पगारे, गट नं. १, शिवमंदिराजवळ, मुस्तफाबाद, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नागरे कृष्णा नारायण,<br>रा. सुलतानपूर (गारखेडा), तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद - श्री. जी. डी. सोनवणे | | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, औरंगाबाद प्रतिनिधी<br>- श्री. के. पी. विसपूते, अ. का. (म.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५-१०-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१-११-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व सध्याचे जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०४-०९-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ती अपिलार्थीस देऊ शकतात. माहिती देण्यास उशीर झाला आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल. माहिती प्राप्त झ ाल्यावर त्यात काही त्रुटी आढळल्यास तसे अपिलार्थीने पंधरा दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे व त्यानंतर पंधरा दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती पुरवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नागरे कृष्णा नारायण, रा. सुलतानपूर (गारखेडा), तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लखमीचंद नामदेवराव तलरेजा, : अपीलकर्ता

रा. संत एकनाथ प्राथमिक शाळेजवळ, टिळकनगर, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड,

तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :

उप विभागीय अधिकारी, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३३९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. महादेव आश्रुबा किरवले | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये गॅस सिलेंडरबाबत माहिती मागितली आहे. सदरील माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. ही माहिती प्राप्त करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. एजन्सीला गॅस पुरवठा इत्यादी भारत सरकारच्या कंपनीकडून होतो त्यामुळे ती माहिती भारत सरकारच्या जन माहिती अधिका-याकडून अपिलार्थीस उपलब्ध होऊ शकते.

यावर आयोगाने त्यांना असे सूचित केले की, सदरची माहिती कोणत्या केंद्रीय कार्यालया-तील जन माहिती अधिका-याकडे उपलब्ध होईल याचा तपशील जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लखमीचंद नामदेवराव तलरेजा, रा. संत एकनाथ प्राथमिक शाळेजवळ, टिळकनगर, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, : अपीलकर्ता

संपादक, साप्ताहिक राजनिष्ठा, ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

अधीक्षक अभियंता, दक्षता पथक औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :

अधीक्षक अभियंता, दक्षता पथक औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>अधीक्षक अभियंता, दक्षता पथक औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, दक्षता पथक औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २०-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १८-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २९-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देय होत आहे. अपिलार्थीस यापूर्वी माहिती दिली नसल्यास जन माहिती अधिकारी यांना ती द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस यापूर्वी दिली नसल्यास ती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०८-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, संपादक, साप्ताहिक राजनिष्ठा, ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, अधीक्षक अभियंता, दक्षता पथक औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, दक्षता पथक औरंगाबाद परिमंडळ, पाटबंधारे विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विष्णू नागोजी म्हस्के,<br>रा. समर्थनगर, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, कन्नड, तालुका कन्नड,<br>जिल्हा औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३४१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद - श्री. ए. एस. कोंडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, कन्नड, तालुका कन्नड,<br>जिल्हा औरंगाबाद - श्री. व्हि. के. पालीमकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०६-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये खरीपपूर्व शेतकरी मेळावे संदर्भात व कन्नड तालुक्यातील सन २००१ ते २००९ या कालावधीतील विविध योजनांची तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील संपूर्ण माहिती मागितली होती. ही संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक ०८-१०-२००९ रोजी देण्यात आली आहे.

आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत तथापि अपिलार्थीने दिनांक ०८-१०-२००९ रोजी तालुका कृषि अधिकारी, कन्नड यांना दिलेले पत्र आयोगापुढे आहे. त्यामध्ये अपिलार्थीने नमूद केले आहे की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना मिळाली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विष्णू नागोजी म्हस्के, रा. समर्थनगर, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्रीमती शहेनाज बेगम युसूफ खान,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, वेतन पथक, भविष्य निर्वाह निधी कार्यालय,<br>प्राथमिक विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती शहेनाज बेगम युसूफ खान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक, वेतन पथक,भविष्य निर्वाह निधी कार्यालय, प्राथमिक विभाग, जि.प.औरंगाबाद - श्री.डी.एम.वडमारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.औरंगाबाद- प्रतिनिधी - श्री. बी.बी. पवार, अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास सांगितले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची प्रत मुख्याध्यापक, तलत ऊर्दू प्राथमिक शाळा,कबाडीपुरा,औरंगाबाद यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दि. २३.१०.२००९ रोजी पाठविली आहे व त्याची प्रत मुख्याध्यापक यांनी अपिलार्थीस दिली आहे. तथापि ही प्रत अपिलार्थीस मिळाली नाही,असे अपिलार्थीने सांगितले. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती आठ दिवसांच्या आत विनाविलंब देण्यात यावी, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याची व त्यांना मिळाल्याची खातरजमा करणे आवश्यक होते. जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त प्रकरणांचा निपटारा जलद गतीने होईल, याची दक्षता घ्यावी लागेल. आज सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहितीची प्रत अपिलार्थीस हस्तांतरित करण्यात आली. या माहितीमध्ये काही कागदपत्रे अपुरी असल्यास त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावे लागेल. जन माहिती अधिकारी यांनी तदनंतर पंधरा दिवसांच्या आत पूर्तता करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती शहेनाज बेगम युसूफ खान, घर नं. ५-२-३७, उस्मानपुरा, राममंदीर जवळ, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन पथक,भविष्य निर्वाह निधी कार्यालय, प्राथमिक विभाग, जि.प.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गुलाम फैय्याज सिद्दीकी,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, वेतन पथक, भविष्य निर्वाह निधी कार्यालय,<br>प्राथमिक विभाग, जिल्हा परिषद,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक, वेतन पथक,भविष्य निर्वाह निधी कार्यालय, प्राथमिक विभाग, जि.प.औरंगाबाद - श्री. डी.एम. वडमारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.औरंगाबाद- प्रतिनिधी - श्री. बी.बी.पवार, अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - मुख्याध्यापक, तलत ऊर्दू प्राथमिक शाळा, कबाडीपुरा | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष,मुख्याध्यापक,तलत ऊर्दू प्राथमिक शाळा, कबाडीपुरा, औरंगाबाद अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन २००३-०७ पर्यंत १० टक्के मेंटनन्स ॲण्ड डेव्हलपमेंट म्हणून कपात करण्यात आलेल्या वेतनाबाबतच्या कागदपत्रांच्या छायांकित साक्षांकित प्रती मागितलेल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती मुख्याध्यापक यांच्याकडे असल्याने ती मिळविण्याचे प्रयत्न केले. तथापि ही बाब न्यायप्रविष्ट असल्याचे मुख्याध्यापक यांनी दि. २३.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २७.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. या न्यायप्रविष्ट प्रकरणाची सद्यस्थिती जन माहिती अधिकारी यांना जाणून घ्यावी लागेल व न्यायप्रक्रिया संपुष्टात आली असल्यास माहिती द्यावी लागेल अन्यथा प्रकरणाची सद्यपरिस्थिती कळवावी लागेल.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाच्या स्तरावर अपील प्रकरण बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गुलाम फय्याज सिद्दीकी, घर नं. २-११-४५, पंचकुवॉ, किलेअर्क,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन पथक,भविष्य निर्वाह निधी कार्यालय, प्राथमिक विभाग, जि.प.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विशाल कडूबा पाखरे,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,औरंगाबाद-१ | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>प्रादेशिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी (तत्कालीन)- उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद - श्री. अ.सो.फुलसे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद - श्री. अ.ज्ञा.मोहेकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या सत्यप्रती उपलब्ध करुन देण्याकरिता ₹१५७५/- एवढा खर्च अपेक्षित असून त्याबद्दलचे शुल्क कार्यालयात भरणा करावे, असे दि. २४.०४.२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा न केल्यामुळे त्यांना माहिती देता आली नाही. अपिलार्थी यांनी त्यांचा द्वितीय अपील अर्ज राज्य माहिती आयोगाकडे १४० दिवसाच्या वर विलंबाने सादर केला आहे. माहिती अधिकार अधिनियम १९(३) अन्वये विहित मुदतीत अपील दाखल करणे आवश्यक असते. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे. तरी सुध्दा अपिलार्थीस माहिती मिळण्याच्यादृष्टीने एक संधी म्हणून आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांचे आत अपिलार्थीने माहितीपोटीचे शुल्क भरावे व पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठवावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीने माहितीपोटीच्या शुल्काच्या रकमेचा भरणा करताच पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे सशुल्क माहिती पाठवावी. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विशाल कडूबा पाखरे, सी-५७,जुनी पोलीस कॉलनी,एन-७,सिडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहंमद अब्दुल फहीम, : अपीलकर्ता
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जलसंपदा विभाग
कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जलसंपदा विभाग
कार्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३४५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहंमद अब्दुल फहीम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - विशेष अधीक्षक (अतांत्रिक बाबी), लाभक्षेत्र विकास (जलसंपदा विभाग), औरंगाबाद - श्री.जी. जी. गादेवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - उपअभियंता (तांत्रिक बाबी) लाभक्षेत्र विकास (जलंपदा विभाग),औरंगाबाद - श्री. नाझर अली मोहमंद उस्मान शेख | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - सहायक मुख्य अभियंता, लाभक्षेत्र विकास (जलसंपदा विभाग),औरंगाबाद - श्री. ए.एल.पाठक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७.०८.२००९ |

७ अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख -

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १३.०१.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या एकूण बारा मुद्यांपैकी एकूण नऊ मुद्यांची ४४ पृष्ठे सशुल्क व ११ पृष्ठे विनामूल्य अशी माहिती दि. १६.१०.२००९ रोजी दिली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात ही बाब मान्य केली. उर्वरित तीन मुद्यांपैकी दोन मुद्यांची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये असे सांगितले की, त्यांच्या मूळ अर्जातील तीन (मुद्दा क्र. ४,५ व १०) मुद्यांशी संबंधित माहिती मिळाली आहे व चार (मुद्दा क्र. ३,७,८, व ९) मुद्यांची माहिती अपूर्ण मिळाली आहे व मुद्दा क्र. १२ च्या संदर्भातील माहिती अप्राप्त आहे याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) मुद्दा क्र.३ - या मुद्याबाबतची प्रती त्यांना प्राप्त झाल्या नाहीत. - जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात सांगितले की, ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही.

२) मुद्दा क्र.७ - श्री. अ.ना.वझरकर व श्री. अ.ना.जोशी यांच्या आयकरासाठी सादर केलेल्या वेतन विवरणाची प्रत- माहिती देण्यात यावी.

३) मुद्दा क्र.८- श्री. अ.ना.वझरकर व श्री. अ.ना.जोशी यांच्या एम.आय.एस.संगणक प्रणालीशी संबंधित धारिकेतील हस्तलिखित पत्रव्यवहाराच्या छायांकित प्रती - या मुद्यासंदर्भातील माहिती अपूर्ण प्राप्त झाली असे अपिलार्थीने प्रतिपादन केले. - यासंदर्भातील दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून आयोगाने असे अभिप्राय व्यक्त केले की, नेमक्या पत्रव्यवहाराची माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना कळवावी व तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी त्याअनुषंगाने प्रती अपिलार्थीस द्याव्यात.

४) मुद्दा क्र.९- कार्यविवरण नोंदवहीतील मासिक गोषवाऱ्यांच्या छायांकित प्रती अपिलार्थीस देण्यात आल्या नाहीत - यासंदर्भात आयोगाने निदेश दिले की, ही माहिती उपलब्ध असल्यास देण्यात यावी.

५) मुद्दा क्र. १२ च्या संदर्भात लोकसभा/विधानसभा निवडणुकीच्या कामाकरिता त्यांच्या कार्यालयाने पाठविलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या नावांच्या यादीची प्रत - माहिती देय होत आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस देय होत आहे. ती त्यांना नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहंमद अब्दुल फहीम, फ्लॅट नं.२, स्नेहलता अपार्टमेंट, छत्रपतीनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष अधीक्षक (अतांत्रिक बाबी), लाभक्षेत्र विकास (जलसंपदा विभाग), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक मुख्य अभियंता, लाभक्षेत्र विकास (जलसंपदा विभाग),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, : अपीलकर्ता
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ
मर्या.,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ
मर्या.,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी -श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | नोडल अधिकारी, मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लि.,औरंगाबाद - श्री. शेख मो.इलियास | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित नाहीत. तर त्यांच्याऐवजी त्यांनी मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लि.औरंगाबाद या एजन्सीच्या नोडल अधिकारी यांना आयोगासमोर सुनावणीसाठी पाठविले आहे. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही.

जन माहिती अधिकारी, व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, औरंगाबाद/मुंबई तसेच जन अपिलीय अधिकारी, व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, औरंगाबाद/मुंबई यांची बाजू आयोगास ऐकून घेणे आवश्यक आहे. अपिलार्थी उपस्थित आहेत. त्यांना आतापर्यंत माहिती मिळालेली नाही. ही बाब गंभीर आहे. याकरिता सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी अपिलार्थी, व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, औरंगाबाद/मुंबई कार्यालयाचे जन माहिती व अपिलीय अधिकारी अधिकारी व तसेच या प्रकरणात मंत्रालयातील अल्पसंख्यांक विकास विभागाचे सहसचिव यांची विशेष साक्ष आवश्यक ठरत असल्यामुळे या सर्वांना आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी त्याचप्रमाणे सहसचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, हिना मंजील, मलिक अंबर उड्डानपुलाजवळ, टाऊन हॉल, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, औरंगाबाद/मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, औरंगाबाद/मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सहसचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. एस.एन.काद्री,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३४७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प.) विभाग, औरंगाबाद - श्री. एम.बी.देशपांडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प.) विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीकरिता ₹२/- प्रतिपृष्ठ याप्रमाणे एकूण १०८ पृष्ठांकरिता ₹२१६/- इतके शुल्क कार्यालयात जमा करण्याकरिता दि. ०९.१०.२००९ रोजी कळविण्यात आले आहे.जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली, त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये, अपिलार्थीस शुल्क भरुन माहिती प्राप्त करण्याची पूर्वकल्पना असूनही त्यांनी शुल्क भरलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीचे प्रथम अपील दि. २३.१२.२००९ रोजी निकाली काढले आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर अपील निकाली काढण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत झाले आहे. अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एस. एन.काद्री, रऊफ कॉलनी, नेहरुभवन जवळ,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गजानन बी. पाटील, : अपीलकर्ता

रा. औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अपर पोलीस अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस अधीक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गजानन बी. पाटील | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,औरंगाबाद - श्री. बी.डी.मुसळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,औरंगाबाद - श्री. विनायक देशमुख | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. डी. डी. साबळे (पोलीस निरीक्षक) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अर्जदार यांचा दि. ०२.११.२००९ रोजीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात दि. ०३.११.२००९ रोजी प्राप्त झाला. अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) नुसार दि. २६.११.२००९ रोजी माहिती विहित मुदतीत टपालाद्वारे पाठविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली, त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयामध्ये असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती पाठविलेल्या पत्राची प्रत सादर केली तसेच संबंधित रजिस्टरमधील नोंदी समक्ष दाखविल्या आहेत, यावरुन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पाठविल्याचे आढळून येत आहे. तरीही प्रथम अपिलाच्या निर्णयाच्या प्रतीसोबत पुन्हा एकदा माहितीच्या प्रतीची एक प्रत अपिलार्थीस पाठविलेली आहे. ही बाब कागदपत्रांवरुन आढळून येत आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले की, त्यांना माहिती प्राप्त झालेली आहे, तथापि उशिरा मिळाली आहे. त्याचप्रमाणे त्रयस्थ पक्षाचे पॅनकार्ड व प्रॉपर्टीचा तपशील प्राप्त झालेला नाही. त्यांच्या युक्तिवादानंतर शेवटी अपिलार्थी यांनी निवेदन सादर केले की, त्यांना प्रस्तुत प्रकरणात लेखी म्हणणे सादर करण्यासाठी सात दिवसांचा वेळ मिळावा. यासंदर्भात अपिलार्थीस आयोगातर्फे स्पष्ट करण्यात येत आहे की, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे त्यांचे द्वितीय अपील (दि. २७.०१.२०१०) सादर केल्यापासून आजपावेतो या प्रकरणाबाबत त्यांचकडे भरपूर वेळ होता. त्यामुळे त्यांची ही बाब मान्य करता येत नाही. तसेच अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाचे पॅनकार्ड व प्रॉपर्टीचा तपशील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१)(ङ) च्या निकषानुसार देय होत नाही.

आयोगासमोर केलेला युक्तिवाद व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपील निकाली काढण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०८-०४-२०११**

---------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गजानन बी. पाटील, एल-८०/१,छत्रपती शिवाजीनगर,हडको,एन-९,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अश्विन प्रल्हाद सोनकांबळे,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>अधिष्ठाता यांचे कार्यालय,<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>अधिष्ठाता यांचे कार्यालय,<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - डॉ. अश्विन प्रल्हाद सोनकांबळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद - श्री. एम.ए.जाविदखान | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्राध्यापक व विभाग प्रमुख, शरीररचनाशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,औरंगाबाद - डॉ. सी.व्ही.दिवाण | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना दि. २०.१०.२००९ रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थी यांना ही बाब मान्य आहे. तथापि अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करताना तीन मुद्यांवर माहिती प्राप्त झाली नाही असे नमूद केले होते.प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर त्यांना दि. २१.१२.२००९ रोजी माहिती देण्यात आली आहे. उपरोक्त कागदपत्रांवरुन ही बाब आढळून येत आहे. तथापि अपिलार्थीच्या युक्तिवादात त्यांनी असे प्रतिपादन केले आहे की, त्यांना खालील माहिती अभिप्रेत होती, ती मिळालेली नाही.

"न्यायालयाच्या आदेशाविना ३६४ दिवसांपेक्षा जास्त काम करीत असलेल्या अधिव्याख्यात्यांची (सेवाखंडसहीत) यादी."

ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. तथापि या मुद्याचा समावेश अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये नसल्याचे आयोगास आढळून आले. यासंदर्भात दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर विशेष बाब म्हणून ही माहिती, अपिलार्थीस द्यावी लागेल, असे जन माहिती अधिकारी यांना आयोगाने सूचित केले.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. अश्विन प्रल्हाद सोनकांबळे,२५४,'अनुभूती', नंदनवन कॉलनी, औरंगाबाद - ४३१ ००२.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक व विभाग प्रमुख, शरीररचनाशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख शाकीर शेख अजिज, : अपीलकर्ता
रा. सिल्लोड, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वैद्यकीय अधीक्षक,
उपजिल्हा रुग्णालय, सिल्लोड, जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय,सिल्लोड,जि.औरंगाबाद-डॉ. आर.जी.जाधव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा शल्य चिकित्सक,सामान्य रुग्णालय,औरंगाबाद-डॉ. डी.एन.पाटील | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना दि. २१.११.२००९ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आली आहे व या पत्रामध्ये असेही नमूद केले आहे की, वयाच्या प्रमाणपत्रांच्या प्रती जास्त असल्यामुळे त्यासंदर्भातील माहितीची अपिलार्थी यांनी कार्यालयात उपस्थित राहून पाहणी करावी. तथापि अपिलार्थी यांनी तसे न करता जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिलेल्या निर्णयामध्ये असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या प्रतींची संख्या ३००० पेक्षा जास्त असल्यामुळे व याकरिता वेगळे अनुदान नसल्यामुळे या प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती देणे शक्य होणार नाही. तरी अपिलार्थी यांना यापूर्वी कळविल्याप्रमाणे त्यांनी कार्यालयात उपस्थित राहून कागदपत्रांची पाहणी करावी. या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते व त्यांनी ही बाब मान्य केली. त्यानुसार अपिलार्थी दि. १६.०१.२०१० रोजी कार्यालयात उपस्थित होते व त्यांना उपलब्ध कागदपत्रे दाखविण्यात आली आहेत, असे जन माहिती अधिकारी यांनी पुढे सांगितले.

आज सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या द्वितीय अपील अर्जात त्यांना अर्धवट व चुकीची माहिती मिळाली आहे, असे मोघम नमूद केले आहे.आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती जास्त असल्यामुळे या माहितीशी संबंधित कागदपत्रे पाहणीकरिता कळविले आहे. अपिलार्थी यांनी पाहणी करण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी मान्य केले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०८-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख शाकीर शेख अजिज,रा.अब्दाल शाह नगर, सिल्लोड, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकीत्सक,सामान्य रुग्णालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. यावर अलीखान युसूफखान,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>व्यवस्थापक,<br>शासकीय ग्रंथालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>सहायक ग्रंथालय संचालक,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - निरीक्षक, कार्यालय सहायक ग्रंथालय संचालक,औरंगाबाद- श्री. पो.पु.गायकवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक ग्रंथालय संचालक,औरंगाबाद - श्री. सु.रा.रोकडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५.१०.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली ग्रंथालयासंदर्भातील त्यांच्याकडे देय असलेली संपूर्ण माहिती (पृष्ठ संख्या ५३) इतकी दि. २४.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांना माहिती मिळाल्याचे युक्तिवादावरुन व उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत आहे. तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुन्हा एकदा नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पुन्हा एकदा नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. यावर अलीखान,युसुफ अलीखान, घर नं. ४-१६-१७,रमनस्तपुरा, काली मस्जिदजवळ,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, सहायक ग्रंथालय, संचालक,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक ग्रंथालय, संचालक,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कल्याणमल शांतीलाल पाटणी, : अपीलकर्ता
इ-६२/५, मयुरनगर, एन-११, हडको, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, हिंद सेवा मंडळाची ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा, अकोले, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी, :
हिंद सेवा मंडळाची ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा, अकोले, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२७० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कल्याणमल शांतीलाल पाटणी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, हिंद सेवा मंडळाची ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा, अकोले, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर<br>- सौ. मालवणकर सोनाली सतिष | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>हिंद सेवा मंडळाची ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा, अकोले, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०९-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना संबंधित कार्यालयाकडून माहिती प्राप्त झाली नाही. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी त्यांच्याकडे सादर केलेल्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०८-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कल्याणमल शांतीलाल पाटणी, इ-६२/५, मयुरनगर, एन-११, हडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, हिंद सेवा मंडळाची ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा, अकोले, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, हिंद सेवा मंडळाची ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा, अकोले, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मण विठ्ठल वाणी,<br>रा. रंगारहाटी, काळापहाड जवळ, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद - श्री. जी. डी. सोनवणे | | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, औरंगाबाद प्रतिनिधी<br>- श्री. के. पी. विसपूते, अ. का. (म.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | -- |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०३-२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९-०६-२००९<br>फेरसादर दिनांक<br>२९-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व सध्याचे जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०८-०४-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण विठ्ठल वाणी, रा. रंगारहाटी, काळापहाड जवळ, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिवाजी नारायण वीर, : अपीलकर्ता
हिमायत बाग, भिमराज नगर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२-०१-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत याची आयोग गंभीर दखल घेत आहे. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी नारायण वीर, हिमायत बाग, भिमराज नगर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| | श्री. शेख इलियास, | : अपीलकर्ता |
| | माहिती सेवा समिती, दक्षता अधिकारी, छावणी कॅन्टोनमेंट, औरंगाबाद | |
| | **विरुध्द** | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : उत्तरवादी |
| | अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : |
| | जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३५३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत याची आयोग गंभीर दखल घेत आहे. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख इलियास, माहिती सेवा समिती, दक्षता अधिकारी, छावणी कॅन्टोनमेंट, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संदेश दशरथ बि-हाडे,<br>घर नं. ४-१४-८, सुंदरनगर, नागेश्वरवाडी,<br>औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद - श्री. राजेंद्र काळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>-श्री. ए. एम. देशमुख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६-०१-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास त्यांचा लेखी युक्तिवाद सादर केला व अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन २००९ मध्ये कनिष्ठ सहायक या पदासाठी घेतलेल्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांच्या तसेच चार विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांबाबतच्या प्रती मागितल्या आहेत. त्याचप्रमाणे उत्तरपत्रिका तपासणी अधिकारी यांची नांवे, हुद्दा इत्यादी माहिती मागितली असून नमुना प्रश्नपत्रिका व नमुना उत्तरपत्रिका यांची माहिती मागितली आहे. ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक ०२-०४-२००९ च्या पत्रान्वये एखाद्या उमेदवाराने उत्तरपत्रिकेची प्रत मागितली अथवा त्रयस्थ उमेदवाराच्या उत्तरपत्रिकाची प्रत मागितली तर ती देण्यात येऊ नये असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना कळविले आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीस काहीही माहिती देण्यात आली नाही व अपिलार्थीचा अर्ज निकाली काढण्यात आला आहे. पुढे जन माहिती अधिकारी यांनी असेही सांगितले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला निर्णय योग्य आहे अशी भूमिका (stand) घेतली व अपील निकाली काढले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या उत्तरपत्रिकांची प्रत ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (ड) अन्वये अपिलार्थीस देय होत नाही. तथापि या परिक्षेकरिता एकच प्रश्नपत्रिका असल्याकारणाने त्याची प्रत त्याचप्रमाणे नमुना प्रश्नपत्रिका व नमुना उत्तरपत्रिका प्रत अपिलार्थीस देय होते व त्या जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्याव्या लागतील. तथापि शासकीय अधिकारी यांची नावे इत्यादी तपशीलअपिलार्थीस देय होत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे व अपिलार्थीस देय असलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संदेश दशरथ बि-हाडे, घर नं. ४-१४-८, सुंदरनगर, नागेश्वरवाडी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| | श्री. एस. एन. काद्री,<br>रऊफ कॉलनी, नेहरु भवन जवळ, औरंगाबाद | : अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३५५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. एस. एन. काद्री | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रभारी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद - डॉ. दारुंटे आर. एस. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- डॉ. विलास विखे पाटील | : उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. एम. ई. कोराळे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०३-१०-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती इतर कार्यालयाकडे उपलब्ध असल्याकारणाने त्यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन दिनांक १८-०३-२०१० रोजी अपिलार्थीस दिलेली आहे. अपिलार्थीने ही बाब आयोगासमोर मान्य केली तथापि ही माहिती बरोबर नाही ती अपूर्ण आहे असे सुनावणीच्या वेळी आयोगास सांगितले.

त्रयस्थ उपस्थित आहेत. शासकीय सेवेत असताना त्यांनी घेतलेल्या निवासस्थानाबाबत ही माहिती असल्याकारणाने ती माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये देय होत आहे व ती देण्यास त्यांचा काहीही विरोध नाही असे त्यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सांगितले. याकरिता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०३-१०-२००९ च्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या पाच मुद्दयावरील माहितीबाबत त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवाव्या लागतील. ही माहिती प्राप्त झाल्यावर अपिलार्थी यांनी ती तपासून त्यात काही त्रुटी आढळल्यास पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे व त्यापुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी त्यानुसार पुर्तता करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एस. एन. काद्री, रऊफ कॉलनी, नेहरु भवन जवळ, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रभारी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत
भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विशाल कडुबा पाखरे,<br>सी-५७, जुनी पोलीस कॉलनी, एन-७, सिडको,<br>औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण मंडळ, औरंगाबाद-१ | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण भवन, एमआयडीसी, ए-४/१, चिकलठाणा, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद - श्री. रा. रा. वसावे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद - प्रतिनिधी - डॉ. ब. श. बिरादार, उप प्रादेशिक अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ३०-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीकरिता सत्यपरिस्थिती उपलब्ध करुन देण्याकरिता रुपये १५७५ /- एवढा खर्च अपेक्षित असून त्याबद्दलचे शुल्क कार्यालयात भरणा करावा, असे दिनांक २४-०४-२००९ रोजी अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा न केल्यामुळे त्यांना माहिती देता आली नाही. अपिलार्थी यांनी त्यांचा व्दितीय अपील अर्ज राज्य माहिती आयोगाकडे १४५ दिवसाच्या विलंबाने सादर केला आहे. माहिती अधिकार अधिनियम १९ (३) अन्वये नव्वद दिवसांच्या आत अपील दाखल करणे आवश्यक असते. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे. तरी सुध्दा अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या दृष्टीने एक संधी म्हणून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे एक दिवस सुनिश्चित (सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) करुन पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस शुल्काची आकारणी करुन द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाव्दारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे एक दिवस सुनिश्चित (सकाळी ११-०० ते सायं.०५-००) करुन पाहणीसाठी उपलब्ध करुन द्याव्यात व त्यातून काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस सशुल्क द्याव्यात. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाव्दारे सूचित करावे तसेच ही कार्यवाही हे आदेश प्रापत होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १९-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विशाल कडुबा पाखरे, सी-५७, जुनी पोलीस कॉलनी, एन-७, सिडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.　　　निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, : अपीलकर्ता

संपादक, साप्तहिक राजनिष्ठा, ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मनिष भगवानदास अग्रवाल | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना - श्री. एस. एम. पवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना - श्री. डी. डी. चाटे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १०-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये सन २००८ ते २००९ या कालावधीची विभागीय कार्यालयातील चालू व झालेल्या सर्व कामांची नांवे लेखाशीर्षनिहाय, लेखाशीर्षनिहाय प्राप्त झालेला निधी, चालू व प्रलंबीत देयकांची लेखाशीर्षनिहाय यादी व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद व दक्षता गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांनी किंवा त्यांच्या कार्यालयामार्फत झालेल्या चौकशी व तपासणी अहवालानंतर सदोष प्रकरणी कार्यकारी अभियंता, यांनी केलेली कार्यवाही इत्यादीच्या सत्यप्रती याची मागणी केलेली आहे. ती एकत्रित करुन आज रोजी आणण्यात आली आहे व ती अपिलार्थीस देऊ शकतात. आयोगाने सूचित केल्यानुसार ती अपिलार्थीस देण्यात आली व ती अपिलार्थी यांनी स्विकारली. यामध्ये अपिलार्थीस काही माहिती अपूर्ण आहे असे आढळून आल्यास जन माहिती अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत तसे कळवावे लागेल व पुढील १५ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

या प्रकरणात अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झाला असल्यामुळे जन माहिती अधिकारी हे कलम २० (१) नुसार शास्तीस पात्र ठरत आहे. याकरिता कलम २० (१) च्या परंतुकानुसार संबंधित जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना व या प्रकरणाशी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना एकत्र रुपये २५००० शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा लागेल. सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना नोटीस तामीली करण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी यांना वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी अपूर्ण माहितीबाबत पंधरा दिवसाच्या आत कळविल्यास उर्वरीत माहिती पुढील पंधरा दिवसाच्या आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पाठवावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना व या प्रकरणाशी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना एकत्र रुपये २५००० शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, संपादक, साप्तहिक राजनिष्ठा, ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहमद अब्दुल फहीम, : अपीलकर्ता

फ्लॅट नं. २, स्नेहलता अपार्टमेंट, छत्रपती नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जलसंपदा विभाग कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :

लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जलसंपदा विभाग कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३५८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहमद अब्दुल फहीम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद<br>- श्री. शेख नाझर अली मोहम्मद उस्मान | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक मुख्य प्रशासक, मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद<br>- श्री. अभय लक्ष्मणराव पाठक | : | उपस्थित |
| ३.४ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक अभियंता, जायकवाडी प्रकल्प मंडळ, औरंगाबाद - श्री. मोहम्मद मुश्ताख | : | उपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, जायकवाडी प्रकल्प मंडळ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०९-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २७-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी (२) व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०९-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये एकूण बारा मुद्दयांवर माहिती मागितली आहे. बारा मुद्दयांवरील माहितीकरिता तेरा पृष्ठे सशुल्क देण्यात आली व दहा पृष्ठे निःशुल्क देण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने ही बाब मान्य केली. तथापि काही माहिती अपूर्ण आहे असे त्यांनी आयोगास अवगत केले. ती माहिती व त्यावरील आयोगाच्या सूचना खालीलप्रमाणे असतील.

१. मुद्दा क्रमांक ५ व ६ ची माहिती अपिलार्थीस मिळाली नाही :

ती माहिती मुख्य अभियंता कार्यालयात नाही, मंडळ कार्यालयात आहे ती जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल.

२. अपिलार्थीने ज्या तारखेला मूळ अर्ज केला आहे त्या तारखेच्या त्यावेळेच्या कर्मचा-यांचा तपशील :

माहिती देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल.

३. जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्रमांक १, २ व ३ मधील काही माहिती दिली नाही :

ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणी-नंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आणि अपिलार्थीस देय होत असलेली मुद्दा क्रमांक १ व २ मधील माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक ३ बाबतची माहिती अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात अभिलेखे पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहमद अब्दुल फहीम, फ्लॅट नं. २, स्नेहलता अपार्टमेंट, छत्रपती नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक मुख्य प्रशासक, मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक अभियंता, जायकवाडी प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, जायकवाडी प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रघुनाथ सरदार चव्हाण, | : | अपीलकर्ता |
| | व्दारा, तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | अधीक्षक भूमि अभिलेख, जालना | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांनी सुनावणी घेऊन निर्णय घेतलेला नाही. यास्तव जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०९-

२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०९-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत करणे आवश्यक आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०९-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रघुनाथ सरदार चव्हाण, व्दारा, तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, : अपीलकर्ता

हिना मंजिल, मलिक अंबर उड्डाणपूल जवळ, टाऊन हॉल, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, प्रशासकीय भवन, चौथा मजला, रामकृष्ण चेम्बुरकर मार्ग, मुंबई - ४०० ०७१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, औरंगाबाद | | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, प्रशासकीय भवन, चौथा मजला, रामकृष्ण चेम्बुरकर मार्ग, मुंबई - ४०० ०७१ | | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना माहिती मिळाली नाही असे नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-१२-२००९ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये अपिलार्थीस संपूर्ण माहिती तीस दिवसाच्या आत देण्यात यावी असे नमूद केले आहे. त्यानुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाल्याचे कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी दिली नसल्यास ती त्यांना द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती यापूर्वी अपिलार्थीस दिली नसल्यास ती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, हिना मंजिल, मलिक अंबर उड्डाणपूल जवळ, टाऊन हॉल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, प्रशासकीय भवन, चौथा मजला, रामकृष्ण चेम्बुरकर मार्ग, मुंबई - ४०० ०७१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मिर्झा हनिफ बेग युसूफ बेग, : अपीलकर्ता
रा. शेवगा, ता.जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मिर्झा हनिफ बेग युसूफ बेग | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट सचिव, शेवगा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., शेवगा, ता.जि.औरंगाबाद - श्री. व्ही. के. यशवंते | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद-श्री. जी.जी. मावळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या संस्थेच्या संदर्भात शेअर्सधारक व कर्जधारक सभासदांची माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली आहे. ही माहिती त्यांनी दि. ०३.१२.२००९ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली होती परंतु माहितीचे हे पाकीट त्यांना पोस्ट खात्याकडून परत प्राप्त झाले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात, 'माहिती द्यावी' असा निर्णय यापूर्वीच दिलेला आहे. आज रोजी अपिलार्थी उपस्थित आहेत. त्यांना माहिती मिळालेली नाही. आयोगाने सूचित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणीमध्ये सोबत आणलेली माहितीची कागदपत्रे हस्तांतरित केली. अपिलार्थी यांना आज प्राप्त झालेल्या माहितीसंदर्भात पुढील कार्यवाही योजावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मिर्झा हनिफ बेग युसूफ बेग,रा. शेवगा, ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट सचिव, शेवगा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मर्या. शेवगा, ता.जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. गुलाम फैय्याज पिता गुलाम मोहम्मद,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, बी.एम.सी.आय.इंग्रजी माध्यमिक शाळा,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, मुख्याध्यापक, बी.एफ.सी.आय.इंग्रजी माध्यमिक शाळा,औरंगाबाद - श्री. अतहर अहेमद शुत्तारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी मुख्याध्यापक, बी.एफ.सी.आय.इंग्रजी माध्यमिक शाळा,औरंगाबाद उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गुलाम फैय्याज पिता गुलाम मोहम्मद,घर नं. २-११-४५, पंचकुआ, किलेआर्क, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, बी.एफ.सी.आय.इंग्रजी माध्यमिक शाळा, दिल्ली गेट, रोजाबाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चंद्रशेखर दिगंबरराव सरदेशपांडे, : अपीलकर्ता
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३६३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, औरंगाबाद - श्री. बालाजी क्षीरसागर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद - श्री. वामन कदम | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्यासंदर्भात विचाराधीन द्वितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्ज व यापूर्वी त्यांनी

सादर केलेला दि. २३.०६.२००७ रोजीचा अर्ज एकसारखेच आहेत. दि.२३.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भातील द्वितीय अपिलावर राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाने सुनावणी घेऊन दि. ०५.०२.२००९ रोजी निर्णय पारीत केलेला आहे.या निर्णयासंदर्भात अपिलार्थीने कलम १८ खाली दाखल केलेल्या तक्रारीवरसुध्दा राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. १९.०६.२००९ रोजी आदेश निर्गमित केलेले आहेत. उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोगास ही बाब आढळून येत आहे. त्यामुळे विचाराधीन द्वितीय अपिलावर नव्याने विचार करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. यापूर्वी द्वितीय अपील क्र. २३४३/२००७, निर्णय दिनांक ०५.०२.२००९ संदर्भात आयोगाने दिलेला निर्णय व त्यावरील कलम १८ अन्वये दाखल झालेल्या क्र. २००९/रामाआ/तक्रार/०७ या तक्रारीसंदर्भात दि. १९.०६.२००९ रोजी पारीत केलेल्या आदेशाबाबत स्वतंत्रपणे प्रक्रिया पुढे चालू राहील. तथापि विचाराधीन प्रकरणाबाबत आयोगाने विचारणा केली असता, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,औरंगाबाद यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन १९८१ सालची दि.०२.०९.१९८१ रोजी तहसीलदार,औरंगाबाद यांनी दिलेल्या अकृषिक आदेशाच्या व त्यासोबत असलेल्या लेआऊटच्या प्रतीची मागणी केली आहे. या कागदपत्रांचा शोध संपूर्ण कार्यालयातील अभिलेखात घेऊनही ती आढळून आली नाहीत. त्यामुळे तहसील कार्यालयातर्फे सन १९८१ ते १९८५ या कालावधीत कार्यरत असलेल्य सर्व अभिलेखापालांना कारणे दाखवा नोटीस काढल्या असून शिस्तभंगविषयक कारवाईची शिफारस जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे प्रस्तावित केली आहे. चौकशीनंतर संबंधितांवर उचित कार्यवाही करण्यात येईल.

या सर्व बाबी विचारात घेता विचाराधीन द्वितीय अपील आयोगाच्या स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे व खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रशेखर दिगंबरराव सरदेशपांडे, १,समतानगर,कांचनवाडी,वाल्मीनाका, पैठणरोड,औरंगाबाद - ४३१ ००५.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. असोदोद्दीन फसीयोद्दीन अन्सारी,<br>रा. पैठण,जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, पैठण, जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, पैठण, जि.औरंगाबाद - श्रीमती वंदना गेवराईकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद - श्री. वामन कदम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी पैठण तालुक्यातील सन १९५० ते १९६० (महाराष्ट्र राज्य निर्मितीपूर्वीची) केरोसिन घाऊक व

अर्धघाऊक विक्रेत्यांची नावे व पत्ते व परवान्याच्या छायाप्रती अशी विस्तृत स्वरुपातील माहिती त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली आहे. ही माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये शोध घेऊनही मिळू शकली नाही. याबाबत अपिलार्थीस दि.२३.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. तथापि सदर पत्रावरील तारीख ही दि. २३.११.२००९ नसून दि. २३.१२.२००९ अशी बरोबर आहे. जन माहिती अधिकारी यांनी सांगितलेल्या सद्यपरिस्थितीस जन अपिलीय अधिकारी सहमत आहेत.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. असोदोद्दीन फसियोद्दीन अन्सारी, चौधरी मोहल्ला,पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पठाण मोबीन खॉ महेबुबखॉ,<br>रा.सिल्लोड, जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, सोयगाव, जि. औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, सिल्लोड,जि. औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पु.), तहसील कार्यालय,सोयगाव, जि. औरंगाबाद - श्री.एस. डी. कातपुरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, सोयगाव,जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी,सिल्लोड,जि.औरंगाबाद -प्रतिनिधी - श्री. टी. आर. ताठे,अ.का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार(पु.) यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे सोयगाव तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेसंदर्भातील तालुका दक्षता समितीची दि. ०१.०४.२००८ ते १६.११.२००९ या कालावधीतील माहिती मागितलेली आहे. तथापि या कालावधीत दक्षता समिती गठीत झालेली नव्हती, त्यामुळे त्या समितीची बैठक झालेली नाही. त्याचप्रमाणे सचिव या नात्याने तहसीलदार, सोयगाव यांनीही बैठक घेतली नाही, असे कार्यालयीन कागदपत्रांचा शोध घेतला असता आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देता आली नाही. तसेच अपिलार्थीने काही मुद्यांवर लेखी अभिप्राय व प्रश्न विचारलेले असल्यामुळे माहिती देण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, त्यांनी अपिलार्थीस दि. ०८.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिलेला आहे व सदरच्या माहितीसंदर्भात दि. २८.०३.२०११ रोजी अपिलार्थीस कळविण्यात आले आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत आहे. तथापि याबाबत उपविभागीय अधिकारी,सिल्लोड तथा तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांना वर नमूद केलेल्या बाबींची एकदा खातरजमा करुन घ्यावी लागेल व त्याप्रमाणे अपिलार्थीस कळवावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपविभागीय अधिकारी,सिल्लोड तथा तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी वर नमूद केलेल्या बाबींची एकदा खातरजमा करुन घ्यावी व त्याप्रमाणे अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत कळवावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पठाण मोबीन महेबुबखाँ, डॉ. जाकीर हुसेन नगर,डॉ.फिरोजच्या बाजुला, सिल्लोड,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु.), तहसील कार्यालय,सोयगाव,जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,सिल्लोड,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पंजाबराव केशवराव देशमुख,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपसंचालक, भूमी अभिलेख,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख,पुणे | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.पंजाबराव केशवराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | सहायक जन माहिती अधिकारी - वरिष्ठ लिपीक, उपसंचालक,भूमी अभिलेख कार्यालय,औरंगाबाद - श्री. डी. बी. जोसाळकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी -कार्यालय अधीक्षक,उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालय,औरंगाबाद - श्री. ठाकूर चंद्रशेखर | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - उपसंचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद प्रदेश,औरंगाबाद - श्री. व्ही.टी.मुळे | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, सहायक जन माहिती अधिकारी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी झालेली नाही. तथापि मूळ अर्ज सन २००९ चा असल्यामुळे प्रकरणामध्ये अधिनियमातील कलम १९(३) अंतर्गत नमूद तरतुदी शिथील करुन द्वितीय अपील स्वीकारण्यात येऊन प्रकरणाची सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी यांना खालीलप्रमाणे माहिती अभिप्रेत आहे.

१) अपिलार्थीच्या वेतन निश्चितीबाबत सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज सादर करताना करावयाचा विहित मार्ग - यासंदर्भात शासकीय संकेतासंदर्भातील परिपत्रिके/निर्णय/आदेशाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना द्याव्या लागतील.

२) अपिलार्थी हे माजी सैनिक आहेत - त्यांच्या वेतन निश्चितीबाबतचे महाराष्ट्र शासनाच्या शासन नियम/आदेश परिपत्रकाच्या झेरॉक्स प्रती द्याव्या लागतील.

३) वेतन निश्चितीबाबत अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या अर्जावर कार्यवाही करण्याची मुदत निश्चित केला असल्यास परिपत्रकाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना द्याव्या लागतील, नसल्यास तसे कळवावे लागेल.

४) अपिलार्थी यांनी सादर केलेल्या वेतन निश्चिती करण्यासंदर्भातील अर्जावर वेगवेगळया स्तरावर घेतलेल्या टिपणी/शेरे इ.च्या नोटशीट किंवा पत्राच्या प्रती- या देय होत आहेत.

ही उपरोक्त मुद्दा क्र.१ ते ४ मधील माहिती जन माहिती अधिकारी यांना तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती आयोगाचे हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १९-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पंजाबराव केशवराव देशमुख, घर नं. सी-५८/१४,११ वी योजना,सिडको, शिवाजीनगर,गारखेडा परिसर,औरंगाबाद - ४३१ ००५.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक,उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद प्रदेश,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जगदिश लक्ष्मण धनतोले, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा व्यवस्थापक,
संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ,
मर्या.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा व्यवस्थापक,
संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ,
मर्या.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जगदिश लक्ष्मण धनतोले | : | उपस्थित |
| ३.२ | सहायक जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, लिडकॉम,औरंगाबाद - सौ. लिला एस.साळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती व अपिलीय अधिकारी - विभागीय अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, लिडकॉम, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, सहायक जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सहायक जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की,त्यांचे कार्यालय महाराष्ट्र शासनाचे मंडळ आहे. त्यांना पूर्ण अनुदान शासनाकडून प्राप्त होते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे दि. ०१.०४.२००८ ते १४.११.२००९ या कालावधीमध्ये मंजूर केलेल्या कर्ज प्रकरणातील सर्व लाभार्थीची नावे व त्यांच्या अर्जाच्या पहिल्या पृष्ठाची छायांकित प्रत अशी विस्तृत स्वरुपातील माहिती मागितली आहे. या कालावधीमध्ये सुमारे ३ ते ४ हजार कर्ज प्रकरणे मंजूर झाली असतील. याच्या प्रति काढण्यास येणाऱ्या किंमतीचा अपिलार्थीस कार्यालयात भरणा करावा लागेल असे दि. ४.१२.२००९ रोजी कळविले आहे. यावर आयोगाने सूचित केले की,अपिलार्थी यांनी या सर्व माहितीसाठी खर्च देण्याऐवजी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सदरच्या माहितीची पाहणी करावी व त्यातील आवश्यक असलेली कागदपत्रे सशुल्क घ्यावीत, जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७ (९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती सशुल्क द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.ही बाब अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी मान्य केली.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती सशुल्क द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जगदीश लक्ष्मण धनतोले, पवननगर,एन-९,के-७२/१,सिडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, लिडकॉम, औरंगाबाद द्वारा महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ,सेक्टर-पी-२८,राज पेट्रोल पंपाच्या मागे,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, लिडकॉम,औरंगाबाद द्वारा महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ,सेक्टर-पी-२८,राज पेट्रोल पंपाच्या मागे,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. महमंद अब्दुल अजिज,<br>रा. औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद - श्री.एस.एन.जफर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद - प्रतिनिधी - अमिन अ.जमा, संगणक चालक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते.

त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महंमद अब्दुल अजीज मुतवली मस्जीद, बागशेरजंग, दाऊदपुरा, मस्जीद कम्पाऊंड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मुकुंद लक्ष्मणराव महाजन, : अपीलकर्ता
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सचिव, दादेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था,
दादेगाव (जा), ता.पैठण, जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक निबंधक, सहकारी संस्था, तालुका पैठण, जि. औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२०५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.०८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०.०९.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.११.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचा कोणी प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. १२.११.२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या

दि. २३.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये कर्जप्रकरणाबाबतची माहिती मागितलेली दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक,ता.पैठण यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २०.०९.२००८ रोजी निर्णय घेतल्याचे व निर्णयामध्ये अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले असल्याचे दिसून येत आहे. प्रकरणाची सद्यपरिस्थिती संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन अवगत होऊ शकत नाही. तथापि यापूर्वी माहिती दिली नसल्यास, सहकारी संस्थांच्या संदर्भात उच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेऊन या प्रकरणाबाबत जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक,सहकारी संस्था, पैठण,जि.औरंगाबाद यांनी संबंधित संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय होत असलेली माहिती देण्याची कार्यवाही करणे उचित राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक,सहकारी संस्था, पैठण,जि.औरंगाबाद यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संबंधित संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय होत असलेली माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुकुंद लक्ष्मणराव महाजन, दुर्गावाडी, पैठण, ता.पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, दादेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, दादेगाव (जा), ता.पैठण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक,सहकारी संस्था, पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत
भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. राजू सुर्यभान हिवराळे,<br>रा. जयभिमनगर, टाऊन हॉल, गुलाबवाडी,<br>औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२-०९-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२-१२-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०१-२००९<br>फेरसादर दिनांक<br>०३-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत याची आयोग गंभीर दखल घेत आहे. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास

आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजू सुर्यभान हिवराळे, रा. जयभिमनगर, टाऊन हॉल, गुलाबवाडी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. भगवान पुंजाराम बनकर,<br>रा. गंगापूर, जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>व्यवस्थापक, खरेदी विक्री संघ मर्या., तालुका गंगापूर,<br>जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - व्यवस्थापक, खरेदी-विक्री संघ मर्या.ता.गंगापूर, जि.औरंगाबाद - श्री. भा.का.सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२.०२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९.०५.२००६ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०६.२००६ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, खरेदी विक्री संघ मर्या. ता.गंगापूर,जि.औरंगाबाद उपस्थित आहेत. अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील दि. ३०.०५.२००६ रोजीचे आहे. जन

माहिती अधिकारी नवीन असल्यामुळे व प्रकरण जुने असल्यामुळे प्रकरणाशी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोगास असे दिसून येत आहे की,जिल्हा उपनिबंधक तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०५.२००६ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेऊन अपिलार्थीस माहिती द्यावी व आवश्यकता असल्यास खरेदी-विक्री संघाचे दस्तऐवज पाहण्याची मुभा द्यावी, असा निर्णय घेतला आहे. प्रकरणाची सद्यपरिस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. यापूर्वी माहिती दिली नसल्यास, सहकारी संस्थांच्या संदर्भात उच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेता या प्रकरणाबाबत जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,औरंगाबाद यांनी संबंधित संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय होत असलेली माहिती देण्याची कार्यवाही करणे उचित राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,औरंगाबाद यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संबंधित संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय होत असलेली माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भगवान पुंजाराम बनकर, द्वारा रेणुका टाईपिंग अँड झेरॉक्स, पंचायत समिती गेटजवळ, शिवाजी चौक, गंगापूर,जि.औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, खरेदी-विक्री संघ मर्या.ता.गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.